आधुनिक केसरी
गुरुवार, २ फेब्रुवारी २०२३




# मोदींचे मिशन सप्तर्षी

## अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांचा सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत २०२३- २४ या वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी सप्तर्षींचा उल्लेख केला. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पाचे सात आधार सांगितले. तसेच, अर्थसंकल्पात सात गोष्टींना प्राधान्य दिले आहे. काय आहेत या गोष्टी जाणून घेऊया. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आपल्या बजेटच्या भाषणात सप्तर्षींचा उल्लेख केला आहे. अमृतकाळात देशाचा विकासाला दिशा देईल. हे सरकारची विचारधारा सबका साथ सबका विकास असून यामध्ये शेतकरी, वंचित घटक, अनुसूचित जाती-जमाती या घटकांचाही समावेश आहे, असे निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे. निर्मला सीतारमण यांनी उल्लेख केलेल्या सप्तर्षी कोणत्या आहेत.**



### काय महाग होणार ?

सोने, चांदी आणि प्लॅटिनम सिगारेट ( कस्टम ड्युटी वाढून आता १६ टक्के इतकी झाली आहे . ) देशी किचन चिमणी



### काय स्वस्त होणार ?

मोबाईल फोन आणि कॅमेरा लेन्स एलईडी टीव्ही आणि बायोगॅसशी संबंधित उपकरणे, इलेक्ट्रिक कार, खेळणी आणि सायकल

### ज्येष्ठ नागरिकांना दिलासा

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बचत योजनेशी संबंधित नवीन घोषणा केल्या . याचदरम्यान त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना देखील दिलासा दिला आहे . केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिक बचत योजनेची कमाल ठेव मर्यादा ३० लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे . तर दुसऱ्या बाजूला एकल खात्यासाठी ( सिंगल अकाऊंट ) पोस्ट ऑफिस मासिक उत्पन्न योजना ९ लाख रुपये आणि संयुक्त खात्यांसाठी ( जॉईंट अकाऊंट ) १५ लाख रुपये इतकी करण्यात आली आहे . अर्थमंत्री सीतारमण यांनी महिला सन्मान बचत प्रमाणपत्र योजना २ वर्षांच्या कालावधीसाठी प्रस्तावित केली आहे . या योजनेअंतर्गत महिलांना अंशत : पैसे काढण्याची सुविधा मिळेल . तसेच दोन वर्षांसाठी ७ .५ टक्के व्याजाने २ लाख रुपयांची ठेव सुविधा प्रदान केली जाईल .नरेंद्र मोदी सरकारचं हे ५ वर्षांच्या कार्यकाळातले अखेरचे पूर्ण बजेट आहे . तर निर्मला सीतारमण या स्वतंत्र भारतातल्या सलग ५ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या पाचव्या अर्थमंत्री ठरल्या आहेत . सीतारमण यांच्याव्यतिरिक्त अशी कामगिरी अरुण जेटली, पी . चिदंबरम, यशवंत सिन्हा, मनमोहन सिंह आणि मोरारजी देसाई यांनी केली आहे .



### महिला सन्मान बचत पत्र योजनेची घोषणा

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी महिलांसाठी काही महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत . अर्थमंत्र्यांनी स्वतंत्र्याच्या अमृतकाळात महिलांसाठी नवी बचत योजना सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे . दोन वर्षांसाठी या योजनांचा लाभ घेता येईल . निर्मला सीतारमण यांनी बजेटमधून महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे . यावेळी ८१ लाख महिला बचतगटांचे सबलीकरण करण्यात येणार आहे . महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून त्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी नवीन योजना आखण्यात येत आहेत, असे निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे . यावेळी अर्थमंत्र्यांनी महिलांसाठी एक मोठी घोषणा केली आहे . महिला सन्मान बचत पत्र, अशी ही योजना असून या दोन वर्षासाठी या योजनांचा लाभ घेता महिलांना घेता येईल . याचा कालावधी मार्च २०२५ मध्ये पूर्ण होईल . म्हणजेच, मार्च २०२५ पर्यंत महिला २ लाख रुपयांपर्यंतच्या बचतवर ७ .५ टक्के इतके व्याज वर्षाला दिले जाईल . दोन वर्षाच्या काळात गरज लागली तर यातील थोडी रक्कम काढून घेता येईल . दरम्यान, आर्थिक वर्ष २०२३ – २४साठी सादर होणारा हा अर्थसंकल्प हा सीतारामन यांचा सलग पाचवा पूर्ण अर्थसंकल्प आहे . तसेच, निर्मला सीतारमण या अर्थसंकल्प मांडणाऱ्या दुसऱ्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत . तसेच, हा निवडणुकीपूर्वीचा विद्यमान मोदी सरकारचा हा शेवटचा केंद्रीय अर्थसंकल्प असणार आहे .



### इलेक्ट्रिक वाहने होणार स्वस्त, पाहा सर्व घोषणा

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी बजेट २०२३ – २४ च्या भाषणात ऑटोमोबाइल सेक्टर संबंधी काही महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत . इलेक्ट्रिक वाहनांची विक्री वाढवण्यासाठी बजेट २०२३ मध्ये काही खास सूट दिली आहे . इंम्पोर्टेड लिथियम आयन बॅटरी वर लागणारी कस्टम ड्युटीवरील मर्यादा एक वर्षापर्यंत वाढवली आहे . त्यामुळे इलेक्ट्रिक वाहने आता स्वस्त होण्याची शक्यता आहे . केंद्र सरकारने काही निवडक वस्तूवरील कस्टम ड्युटी २१ टक्क्यांवरून १३ टक्केपर्यंत कमी करण्याची घोषणा केली आहे . त्यामुळे सायकल आणि ऑटोमोबाइल्स स्वस्त होणार आहेत .

### जुन्या रुग्णवाहिका गाड्या होणार रिप्लेस

सरकारने जुन्या गाड्यांना हटवण्यासाठी व्हीकल स्क्रॅप पॉलिसीला आणखी मजबूत करण्यासाठी व्हीकल रिप्लेसमेंट पॉलिसी संबंधी महत्त्वाची घोषणा केली आहे . ज्यात प्रदूषण पसरवणाऱ्या गाड्यांना हटवण्याचे म्हटले आहे . केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे की, रुग्णवाहिका ( ॲम्ब्यूलन्स ) चा वापर करणाऱ्या गाड्यांना रिप्लेस करण्यात येणार आहे . एनर्जी सेक्टरसाठी बजेट २०२३ – २४ मध्ये ३५ हजार कोटी रुपयाची घोषणा करण्यात आली आहे . आगामी काळात सोलर एनर्जी वर आणखी काम केले जाणार आहे .

- **कृषी क्षेत्रात स्टार्टअपला प्रोत्साहन**
- **एससी, एसटीसाठीच्या विकासाला प्राधान्य**
- **ग्रीन ग्रोथ बजेटला प्राथमिकता**
- **जॉप क्रिएशन वर सरकारचा फोकस**
- **फ्री धान्यसाठी २ लाख कोटी**
- **मोठ्या धान्य केंद्रासाठी जागतिक केंद्र भारतात**
- **११ .४ कोटी शेतकऱ्यांना सन्मान निधी**
- **देशातील प्रति व्यक्ती मिळकत दुप्पट**
- **११ .७ कोटी घरात शौचालय**



१) **सर्वसमावेश विकास** : हे सरकार सबका साथ सबका विकास या अजेंड्यावर काम करत आहे . कोणताही भेदभाव न करता समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करणे हे या सरकारचे उद्दिष्ट आहे . त्यामुळेच त्यांनी सर्वसमावेशक विकासाचा उल्लेख केला आहे .

२) **वंचित घटनांना प्रधान्य** : अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात नमूद केले आहे की हे सरकार देशातील वंचित घटकांसाठी काम करेल . तसेच, देशातील वंचिताच्या विकासासाठी पूर्णपणे प्रयत्न करेल . सरकारकडून वंचित घटनांना अधिक प्रधान्य देण्यात येईल .

३) **पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक** : अर्थसंकल्पीय भाषणात पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीवर भर दिल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे . देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग कायम ठेवण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर काम करणे आवश्यक आहे . यासोबतच गुंतवणूक वाढवण्यासाठी उपाययोजनांवर भर देण्यात येतील, असेही अर्थमंत्र्यांनी नमूद केले .

४) **क्षमता विस्तार** : जोपर्यंत तरुणांच्या क्षमतांचा विस्तार होत नाही, तोपर्यंत अर्थव्यवस्था वेगाने विकसित होऊ शकत नाही, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे .

५) **हरित विकास** : हरित विकासचा अर्थ कृषी क्षेत्र आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यांबाबत धोरण आखणे . यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारकडून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकार प्रयत्न करणार, असे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे .

६) **युवक** : सप्तर्षी योजनेत तरुणांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे . भारताची सर्वात मोठी ताकद ही युवाशक्ती आहे हे लक्षात घेऊन अर्थमंत्र्यांनी तरुणांकडे विशेष लक्ष देण्यात आलं आहे, असे सांगितले .

७) **आर्थिक क्षेत्राचा विकास** : सप्तर्षी योजनेचा शेवटचा मुद्दा आर्थिक क्षेत्र आहे . म्हणजेच देशाच्या आर्थिक स्थितीचा फायदा होण्यासाठी सरकार शक्य ती सर्व पावले उचलेल .

### मध्यमवर्गाला सक्षम बनवणारा अर्थसंकल्प



समृद्ध आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची ताकद ही देशाच्या मध्यमवर्गात आहे . युवा वर्ग ही जशी भारताची ताकद आहे तसा मध्यमवर्ग ही जमेची बाजू आहे . या वर्गाला सक्षम बनवण्यासाठी आम्ही अनेक निर्णय हे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून घेतले आहेत . प्राप्तिकर रचना अधिक पारदर्शक केल्यामुळे आता मध्यमवर्गाला आणखी दिलासा मिळणार आहे अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पावर दिली आहे .

### सगळ्याच समाजघटकांना न्याय



आता निवडणुका आहेत म्हणून बजेट करायचे नाही का ? हे दरवर्षी होणारे बजेट आहे . विरोधी पक्षाने खऱ्या अर्थाने स्वागत केले पाहिजे . रेल्वेसाठी किती तरी मोठ्याप्रमाणात बजेट दिले आहे . माझ्या माहितीनुसार २०१३ पासून ते आतापर्यंत नऊ पटीने रेल्वेसाठी बजेट वाढवलेले आहे . सगळ्याच समाजघटकांना न्याय देण्याचे काम करण्यात आले आहे . शेतकरी हा केंद्रबिंदू मानला गेला आहे .शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आतापर्यंत कोणत्याही बजेटमध्ये एवढी तरतूद केली नव्हती, तेवढी तरतूद या बजेटमध्ये करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहेत .

### अमृतकाळातील सर्वजनहिताय अर्थसंकल्प




केंद्रीय अर्थसंकल्पातून शेवटच्या व्यक्तीचा, शेतकरी, आदिवासी, महिला, युवा, मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांचा विचार करण्यात आला आहे . स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवापासून प्रारंभ झालेल्या ' देशाच्या अमृतकाळातील सर्वजनहिताय ' असा हा केंद्रीय अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली .

### महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली



लोकसभेसह नऊ राज्यांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन तयार केलेला हा फसवा अर्थसंकल्प आहे . २०१८ ते २०२२ या काळात देशाचा ' जीडीपी ' वाढीचा दर सरासरी अवघा तीन टक्के असताना हा देशाचा अमृत काळ कसा होऊ शकतो, असा सवाल करत, देशाला प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष कररुपाने सर्वाधिक महसूल देणाऱ्या महाराष्ट्राच्या वाट्याला फारसे काही आलेले दिसत नाही, तोंडाला पाने पुसणारा अर्थसंकल्प असल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

विद्यार्थ्यांसाठी त्यांनी फार्म टू प्लेट हा उपक्रम राबवला होता. ती शाळा शेतातच वसलेली आहे. मुलांनी झाडांची, फळभाज्यांची देखरेख करायची. ती वाढवायची. ती कशी वाढतात याचे निरीक्षण करायचे. नंतर प्रत्यक्ष या भाज्या शिजवायच्या आणि त्या शिजवण्याच्या म्हणजेच स्वयंपाकाच्या प्रक्रियेचे ज्ञान मिळवायचे. स्वयंपाकात सुद्धा शास्त्र आहे, विज्ञान लपलेलं आहे. ते मुलांना अशा अनुभवातूनच कळते. यातून मुले काय शिकत नाहीत ? ते वनस्पतींची वाढ शिकतात, स्वयंपाक करताना जे विविध पदार्थ आपण वापरतो, त्यांची माहिती मिळवतात. त्यातली कला आणि त्यातले शास्त्र सुद्धा त्यांना कळते. वनस्पतीची वाढ होताना त्यांना अन्न , हवा, प्रकाश इ गोष्टींचे काय महत्व आहे हे त्यांच्या लक्षात येते. एकूणच विद्यार्थी अनुभवाने समृद्ध होत जातात. या उन्हाळयाच्या सुटीत सगळीकडे लॉकडाउन आणि ऑनलाईन शिक्षणाची चर्चा असताना, त्यांनी आपल्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गृहपाठाचा एक वेगळाच प्रयोग राबवला. तो मधुमेहाच्या रुग्णांचा अभ्यास करण्यासंदर्भात होता. त्या मुलांना त्यांनी आधी सांगितलं की आज जगात गन पावडर ( दहशतवाद ) यामुळे साधारण २५००० लोकांचा मृत्यू होतो, तर शुगर पावडर ( साखर ) मुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या सुमारे पस्तीस लाख आहे. आणि २०३० पर्यंत या संख्येत दुप्पट वाढ होण्याची शक्यता आहे. म्हणजे आज जे विद्यार्थी दहावीत शिकत आहेत, उद्या त्यांनाही या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. त्या विद्यार्थ्यांना ही जाणीव झाली की आपलाही समावेश त्या लोकांमध्ये असणार आहे. मग त्या मुलांना त्यांनीआपल्या घरातील, आपल्या आजूबाजूला असलेल्या मधुमेही लोकांच्या मुलाखती घ्यायला सांगितल्या. एकदोन दिवस त्या मुलांनी मग बिनसाखरेचा चहा, दूध आणि जेवण घेऊन पाहिले . मग त्यांना स्वतःच लक्षात आले की मधुमेही रुग्णांची अवस्था कशी असते, त्यांना खाण्याच्या बाबतीत कशा तडजोडी कराव्या लागतात, कसा संयम ठेवावा लागतो. या मुलांनी मग या संदर्भात तज्ज्ञ डॉक्टरांची मुलाखतही घेतली. ती मुलं यातून त्यांना असलेल्या जीवशास्त्रातील बरेचसे धडे आपोआप शिकले. शिवाय आपल्या घरातील कोणाला मधुमेह असेल तर त्यांना नियमित व्यायाम करा, व्यायाम टाळू नका असा प्रेमाचा सल्ला देऊ लागले. हे असते खरे शिक्षण. शिवाय जे काही आपण शिकतो, त्याचा वापर करणं किंवा करता येणं हे जेव्हा शक्य होतं, तेव्हा ते शिक्षण खऱ्या अर्थाने अंगात मुरले असे म्हणता येईल. ज्या शिक्षणाचा व्यवहारात वापर मुले करत नाहीत, ते शिक्षण म्हणजे नुसती पोपटपंची म्हणावी लागेल. **क्रमशः**



# आनंदी पहाट

## व्यवहारातील विश्वास महत्वाचा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्यापैकी अनेकांना सतत भेडसावत असलेली समस्या म्हणजे एकमेकांच्या व्यवहारातील अविश्वसनीयता. आपण कितीही विश्वासाने व्यवहार केला तरीही, त्याची अंतिम परिणती काय असेल काहीच समजत नाही. आयुष्यभराची जमापुंजी वार्धक्यात उपयोगी पडावी आणि जोपर्यंत वापरावी लागत नाही तो पर्यंत चांगला परतावा येईल ह्या माफक अपेक्षेने एखाद्या खाजगी उद्योगांत, खाजगी बँकेत गुंतवणूक करण्याच्या हेतूने जमा करून ठेवावी, इतका प्रांजळ दृष्टीकोन समोर ठेवून केलेला व्यवहार विश्वसनीय ठरेलच ह्याची खात्री नसते. ह्याबाबतीत आपण अभ्यासपूर्वक विचार न केल्यामुळे अथवा भूल-थापांना बळी पडल्यामुळे आणि अधिक फायद्याचा हव्यास केल्यामुळे फसगत आणि कालांतराने पश्चाताप झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याला ज्ञात आहेत. अनेकदा एकाच कुटुंबातील व्यवहारात देखील कटुता आल्याचे आणि आपापसातील वाद चव्हाट्यावर आल्याचे आपल्याला कळते. नाते आणि व्यवहार एकाच तराजूमध्ये तोलायला सुरुवात झाली कि आपापसातील व्यवहारामुळे नाती संपुष्टात आल्याचे अनेकदा आपल्याला दिसून येते. कोणत्याही व्यवहाराला आणि नातेसंबंधाला सुद्धा आपण कितीही कायद्याच्या चौकटीत ठेवायचं ठरवले तरीही, सरतेशेवटी त्याचा संबंध विश्वासाशीच येतो. मुळाक्षरे, बाराखडी अथवा वर्णमाला सगळेच शिकत असतात. पण ह्या वर्णमालेत सुसंवादातला मिसळला तर त्याचीच सुवर्णमाला तयार होत असते. ही सुवर्णमाला तयार करण्यासाठी आपल्याला आश्वस्त करणारा विश्वासच महत्वाचा आणि त्यामुळेच आवश्यक असतो. म्हणूनच आश्वस्त करणारा विश्वास हा श्वासाइतकाच महत्वाचा असतो, ह्याची सतत जाणीव ठेवणे आवश्यक असते. प्रमुख्याने पती- पत्नीच्या नाजूक नात्याच्या बाबतीत तर एकमेकांमध्ये आश्वासकता टिकवून ठेवणारा विश्वास असावा लागतो. अलीकडच्या काळांत मात्र त्यांच्यातील विश्वासाला अगदी लहानसहान बाबींमुळे तडा जाताना दिसत आहे.



आधुनिक केसरी

**निरंतर धाम | चैतन्याचे ||**
नामाचा महिमा | कळू दे रे मना ||
जळू दे वासना | विकारांची ||१||
तुझ्या घरा आग | लावी अहंकार |
मायावी संसार | घात करी ||२||
नको मानु कैसा | खेद आता जीवा ||
नाम घे केशवा | आनंदाने ||३||
मज दिसु लागे | सुखाचे माहेर ||
दिंडीचा जागर | भिमातीरी ||४||
नामावीन नाही | मनासी आराम ||
निरंतर धाम | चैतन्याचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**१००% यशाचे गमक 0% अपेक्षेत आहे. प्रयत्न कराच पण अपेक्षा करू नका. अपेक्षा करण्यात वेळ वाया जाईल; त्यापेक्षा प्रयत्न करणेच श्रेयस्कर होय.**

**जगात तुमच्यापेक्षा कनिष्ठ व्यक्तीशी व्यवहार करताना विसरू नका तुमच्याही पेक्षा वरिष्ठ कोणीतरी आहे. तुम्हाला तुमच्या वरिष्ठाकडून जी वागणूक अपेक्षित असेल तशीच वागणूक तुम्ही तुमच्या कनिष्ठ व्यक्तीस द्या.**

# बध्दमुक्तनिरूपण


आधुनिक केसरी

आता तुम्ही म्हणाल जर ब्रम्हाला आकार रंग,रूप नाही तर ते कसे ओळखायचे ? तर तो परमात्मा निर्गुण व गुणातीत आहे. अद्रयुष्यात आहे अव्यक्त आहे अचिंत्य व चिंतनाच्या पलीकडे आहे. अशा या अचिंत्य, अव्यक्तरूप, निर्गुण, गुणात्मा,सगळ्या जगताचा आधार असलेल्या चैतन्यरूपी ब्रम्हमूर्तीला आपण मनापासून नमस्कार करूया. आपण आतापर्यन्त जो अभ्यास केला त्याच्या अनुशंगाने विचार केला की ब्रम्ह निर्विकल्प आहे आणि अद्वेत ब्रम्हाचे ध्यान करू लागतो. तेव्हख ज्ञाता आणि ज्ञेय, ध्याता आणि ध्येय, मन आणि वस्तु असे द्वैताचे प्रकार दिसतात. ध्यान धारणा सोडू पहाता, चितन, मनन यापासून दूर जावे म्हटले तर मनात संशयाचा हलकल्लोळ माजतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# काव्य-चरितावली



पुष्प १२वे

आधुनिक केसरी

**देव-मामलेदारांची भेट घेउनी
श्रीमहाराज अक्कलकोट आले
थोर विभूती स्वामीच्या दर्शनाने
मनोमनी समाधान हो पावले ।।
स्वामी म्हणती "बाळ माझा " नि
प्रेमाने स्वामी श्रीमहाराजा सांगती
ऐक बाळ -तुझे काम माझ्याकडे नाही " ...!
श्रीमहाराज मग प्रसाद घेउनी निघाले ।।
श्रीमहाराज हुमणाबाद गावी आले
श्रीमाणिकप्रभू या सिद्धपुरुषा भेटले
म्हणाले ,योग्य वेळी तुझे काम होईल ",
घेउनी निरोप त्यांचा श्रीमहाराज निघाले ।।
कवीअरुणदास म्हणे - काव्यलेखनाचा हा
योग परम भाग्याचा मज हो लाभला ।।**




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# साधन निष्कामबुद्धीने आणि सावधानपणे करावे

आधुनिक केसरी

भगवंतापासून जो निराळा राहात नाही तो मुक्तच. 'मी भगवंताचा' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. 'मी' नसून 'तो' आहे हे जाणणे म्हणजे मुक्तता प्राप्त करून घेणे. देहात असून देहातीत राहतो तो मुक्त. 'राम कर्ता' हे जाणतो तो मुक्त. 'माझे माझे' म्हणून आपण बद्धावस्था लावून घेतो, बद्धाचे आवरण काढून टाकले की आपण मुक्तच आहोत. माझ्या मनावर कशाचाही परिणाम झाला नाही आणि समाधान कायम राहिले, की मुक्तावस्था. 'माझ्यासारखा पापी मीच' असे आपण मनानेच ठरवतो आणि दुःख करीत बसतो. मी एक भगवंताचा झालो, आता नाही कोणाचा, असे म्हणावे, आणि जगात नटासारखे वागावे. वास्तविक, आपण मायेकडून पछाडले गेलो आहोत. भगवंताजवळ माया ही छायेप्रमाणे आहे. आपण मायेचा नियंता जो भगवंत, त्याचे होऊन राहावे; मग माया खरी नाही हे समजते. मायेला ओळखणे म्हणजे विवेक, आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानणे, हे वैराग्य.
पापपुण्य हे मनाचे धर्म आहेत, मी आता नाम घेतो, माझी सर्व पापे त्यामुळे नाहीशी झाली आहेत अशी दृढ भावना झाली की तो निष्पाप झाला हे समजावे. चारचौघे करतात म्हणून साधन करून नाही चालणार. साधनात दृढ भाव पाहिजे. साधन करायचे ते योग्य मार्गाने झाले पाहिजे. ते अगदी निष्काम असावे. बुद्धिभेद करणारे लोक जगात नेहमी असणारच; पण



साधकाने आपला बुद्धिभेद होत नाही इकडे जागृत असावे. काही पुरुष किंवा स्त्रिया यांना आपला स्वतःचा असा काही प्रपंच राहिलेला नसतो, तरीही हे लोक उगीचच जगाचे दोष काढीत बसतात; दुसऱ्यांच्या घरी जाऊन उठाठेव करतात; हे फार मोठे पाप आहे. साधकाने ते कटाक्षाने टाळावे. ज्या लोकांना आपल्यामध्ये दोष आहेत हे कळतच नाही, ते लोक अगदी खालचे समजावेत; ज्यांना आपला दोष कळतो ते दुसऱ्या प्रतीचे समजावेत; आपण प्रयत्न करूनसुद्धा भगवंताच्या आड येणारा दोष जात नाही म्हणून तळमळ असणारे लोक हे सर्वांत चांगले; साधकाने तसे बनले पाहिजे. परमार्थमार्गामध्ये अर्ध्यापर्यंत गेल्यावर, मग पुढे जाणारे साधक फार थोडे असतात. खरे म्हटले म्हणजे साधन आणि वाचन असले की साधक कधी मागे पडायचा नाही. ब्रह्मचारी साधकाने प्रपंचातल्या उठाठेवी करू नयेत, कारण तशाने प्रपंचाचे प्रेम त्याला लागेल. त्याने प्रपंचापासून चार पावले दूर रहावे, नाही तर तोच हवा असे वाटू लागते. जगात किती पोथ्या आणि किती मते आहेत ! एवढे पाहायला वेळ कुठे आहे ? म्हणून साधकाने गीता, ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत, किंवा दासबोध, असा एक ग्रंथ प्रमाण मानून त्याप्रमाणे साधन करावे.

**मुंगी डोंगरावर चढण्याचा प्रयत्न करते आणि कालांतराने का होईना पण वर पोहोचल्याशिवाय राहात नाही, हे ध्यानात घेऊन आपण प्रयत्नाला लागू या.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

सेवासुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥२॥
तुका म्हणे आम्ही जालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥३॥
मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ॥१॥
न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥२॥
तुका म्हणे जालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ॥३॥
शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥१॥

गुरुवार, २ फेब्रुवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१६१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 2 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-161 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे एक लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : केंद्र सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटीच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, ऑनलाइन अर्ज करूनही राज्यातील एक लाख २३ हजार विद्यार्थांचे शिष्यवृतीचे अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवले असल्याचे समोर आले आहे. समाज कल्याण विभागाने पाठपुरावा करूनही महाविद्यालयांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी समाज कल्याण विभागाने मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाईचा इशारा दिला आहे.**



समाज कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी याबाबत आढावा घेतला आहे. मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून नोटीस बजावून महाविद्याल्याची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणार आहे. अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र, राज्य शासनाकडून संयुक्तपणे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती देण्यात येते. महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती, नवबौद्ध संवर्गाचे आतापर्यंत राज्यातून दोन लाख ९० हजार अर्जांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे. त्यापैकी समाज कल्याण विभागाकडे प्राप्त झालेले एक लाख ४२ हजार अर्ज मंजूर करण्यात आले आहेत, तर एक लाख २३ हजार अर्ज महाविद्यालयाकडेच प्रलंबित असल्याने त्यावर समाज कल्याण विभागाला कार्यवाही करता आलेली नाही. तसेच २० हजार अर्ज हे विद्यार्थी स्तरावर प्रलंबित आहेत.

त्यांनी महविद्यालयाकडे अर्ज सादर केलेले नाहीत, असे तपासणीत दिसून आले आहे. महाविद्यालयांच्या चुकांमुळे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज वेळेत सादर केले नाहीत, तर शिष्यवृत्तीला मुकावे लागणार आहे. यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरावेत यासाठी महाविद्यालयस्तरावर जनजागृती करण्याच्या सूचना समाजकल्याणच्या सर्व सहायक आयुक्तांना दिली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास संबंधित महाविद्यालयांवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे प्रस्तावित करण्यात येईल. या संदर्भात कठोर पावले उचलली जातील, असे समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी सांगितले.

## चर्चेतली बातमी

# गडचिरोलीतून लढणार ‘बीआरएस’ विधानसभा


आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांच्या भारत राष्ट्र समिती (बीआरएस) पक्षात अहेरी येथील माजी आमदार दीपक आत्राम यांचा प्रवेश निश्चित झाला आहे. येत्या ५ फेब्रुवारीला नांदेड येथे होणाऱ्या सभेत ते अधिकृतरित्या बीआरएसमध्ये प्रवेश करतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत वेगळे चित्र पाहायला मिळू शकते. तेलंगणा राज्य निर्मितीसाठी लढा देणाऱ्या मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या तेलंगणा राष्ट्र समिती पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर भारत राष्ट्र समिती असे नामकरण करण्यात आले. भविष्यात विस्ताराच्या दृष्टीने या पक्षाकडून महाराष्ट्रातील काही जागा लढविण्यात येणार आहे. त्यात गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी विधानसभेचा समावेश असून माजी आमदार दीपक आत्राम येत्या ५ फेब्रुवारीला नांदेड येथे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करणार आहेत, अशी माहिती आहे. दीपक आत्राम यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची भेटदेखील घेतली होती. अहेरी विधानसभेचा बराचसा भाग तेलंगण सीमेला लागून असल्याने त्या भागात तेलगू भाषिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यादृष्टीने माजी आमदार दीपक आत्राम यांच्या प्रवेशाने पक्षाला बळ मिळू शकते, असे राजकीय जाणकार सांगतात.

# ६ लाख वर्ष जुन्या नेपाळच्या शिलेपासून बनवली जाणार श्रीरामल्लाची मूर्ती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिरातील



रामलल्ला आणि सीता मातेची मूर्ती तयार करण्यासाठी नेपाळहून पवित्र शिला अयोध्येमध्ये आणल्या जात आहेत. दोन शाळीग्राम दगड रस्तेमार्गाने काही वेळातच अयोध्येमध्ये दाखल होतील. या पवित्र शाळीग्राम दगडामध्ये प्रभू श्रीराम आणि सीतामाईची मूर्ती कोरण्यात येणार आहे. यासाठी नेपाळमधील दोन मोठे शाळीग्राम दगड लवकरच अयोध्येमध्ये पोहोचतील. सध्या शाळीग्राम भुवनेश्वरमध्ये दाखल झाले आहेत. राम मंदिरातील श्रीराम आणि सीता माता यांच्या मूर्ती पवित्र शाळीग्राम दगडापासून बनवण्यात येणार आहेत. शाळीग्राम अतिशय पवित्र मानला जातो. हिंदू धर्मामध्ये याला विशेष महत्त्व आहे. ज्या घरामध्ये शालिग्रामची विधीवत पूजा केली जाते, सुख आणि समृद्धी नांदते अशी मान्यता आहे. नेपाळमधील काळ्या रंगाचा दगड शाळीग्राम म्हणून ओळखला जातो. शाळीग्राम हा भगवान विष्णूचा अवतार मानला जातो. त्यामुळे या दगडात प्रभू श्रीरामाची मूर्ती तयार करण्यात येणार आहे. तसेच शाळीग्रामची शिवलिंगाच्या रूपातही पूजा केली जाते.

शाळीग्राम दगड नेपाळच्या गंडकी नदीत आढळतो. या दगडावर किड्याच्या आकारासारख्या खुणा असतात. या खुणा सुदर्शन चक्रासारख्या दिसतात. शाळीग्राम दगडाचे 33 प्रकार आहेत, त्यापैकी 24 प्रकारचे शाळीग्राम भगवान विष्णूच्या 24 अवतारांशी संबंधित असल्याचे मानले जाते.

अयोध्येच्या भव्य राम मंदिराचे बांधकाम सुरु आहे. मंदिरातील श्रीराम-सीतेची मूर्ती तयार करण्यासाठी शाळीग्राम दगड नेपाळमधून अयोध्येत आणला जात आहे.

# हळदीला प्रति क्विंटल दहा हजारांचा दर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** बाजार समितीमध्ये यंदाच्या हंगामातील मुहूर्ताच्या सौद्यामध्ये राजापुरी हळदीला क्विंटलला दहा हजार १०० रुपयांचा दर मिळाला. मुहूर्ताच्या सौद्यामध्ये ८६२ पोती राजापुरी हळदीची आवक झाली असून, सरासरी दर सात हजार ५०० रुपये मिळाला आहे. पहिल्याच सौद्यात चांगला दर मिळाल्यामुळे शेतकरी समाधानी असून, भविष्यातही दर तेजीत राहतील, असा व्यापाऱ्यांनी अंदाज वर्तविला आहे.



नवीन राजापुरी हळद शेतीमाल सौद्याचा शुभारंभ जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकुले यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी तहसीलदार डी. एस. कुंभार, पोलीस निरीक्षक कल्लाप्पा पुजारी, उपनिबंधक सुनिल चव्हाण उपस्थित होते. जिल्हा उपनिबंधक महेश सुरवसे व सचिव महेश चव्हाण यांच्या हस्ते हळदीचा सौदा काढण्यात आला. यावेळी चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष शरद शहा, अडत संघटनेचे अध्यक्ष अमर देसाई, हळद खरेदीदार संघटनेचे अध्यक्ष सतीश पटेल, गोपाळ मर्दा, मनोहर सारडा आदी उपस्थित होते.

नवीन हळद सौद्याचा शुभारंभ मे. गणपती जिल्हा कृषि औधेगिक सह सोसायटी प्लॉट नं. १ या दुकानातून झाला. या दुकानामधील हळद सौद्यामध्ये तासगाव तालुक्यातील पेड गावचे शेतकरी विनोद शिवाजी शेंडगे यांच्या राजापूरी हळदीला क्विंटलला दहा हजार शंभर इतका सर्वोच्च दर मिळाला. सदरची हळद मनाली ट्रेंडींग कंपनी यांनी खरेदी केली आहे. सदरच्या हळद सौद्यात यासाठी किमान ५ हजार व जास्तीजास्त १०१००/- दर मिळाला. सरासरी दर ७५००/- (सात हजार पाचशे ) इतका दर मिळाला आहे. सौद्यामध्ये ८६२ पोती नविन स्थानिक हळदीची आवक विक्री झाली.

# जालन्यातील 'क्रिप्टो' घोटाळ्याप्रकरणी आठ संशयितांना अटकपूर्व जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठवाड्यासह संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या जालन्यातील क्रिप्टो करन्सी प्रकरणातील प्रमोटर किरण खरात आणि त्यांची पत्नी दिप्ती खरात यांना धमकावण्यासह किरण खरात यांना किडनॅप करण्याच्या प्रकरणात आठ संशियत आरोपींवरुद्ध कदीम ठाण्यात 16 जानेवारीला गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान आता या आठही संशयित आरोपींनी अटकपूर्व जामीन मिळाला आहे. या सर्व आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, तो अर्ज मंजूर करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी की, जीडीसी या अभासी चलनात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगून जीडीसी कंपनीचा प्रमोटर म्हणून वावरणाऱ्या किरण खरात यांच्या सांगण्यावरून जिल्ह्यातील हजारों गोरगरीब तसेच श्रीमंतांनी यात पैसे गुंतवविले होते. हा जीडीसी कॉइन 25 डिसेंबर 2022 रोजी खुल्या बाजारात येणार असल्याचे गुंतवणूदारांना सांगण्यात आले होते. परंतु तो त्या दिवशी लाँच झाला नाही. त्यामुळे जीडीसी कॉइनचे दर हे धाडकन कोसाळे. त्यामुळे हजारो गुंतवणूकदारांच्या आशेवर पाणी फेरले. त्यामुळे याप्रकरणी गुंतवणूकदारांनी पोलिसात धाव घेत गुन्हा दाखल केला होता. दरम्यान मंगळवारी जालना येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. डी. देव यांच्या न्यायालयात या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली. या प्रकरणातील संशयितांना अटकपूर्व जमीन मिळू नये, अशी मागणी पोलिसांच्या वतीने न्यायालयाकडे केली होती; परंतु ती मान्य करण्यात आली नाही.



## अर्जुन खोतकरांच्या जावयावर देखील गुन्हा दाखल

या सर्व प्रकरणात प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि माजी मंत्री अर्जुन खोतकर यांचे जावई विजय झोल यांच्यासह त्यांचे भाऊ विक्रम झोल यांनीही किरण खरात यांच्या सांगण्यावरून मोठी गुंतवणूक केल . परंतु, नंतर या कॉइनचे दर कोसळल्याने अपेक्षित वाढीव पैसे मिळणे तर सोडाच, मूळ गुंतवणूकही धोक्यात आल्याच्या कारणावरून विजय झोल व त्यांच्या साथीदारांनी किरण खरात यांना पुणे येथून किडनॅप करून प्रथम औरंगाबादेतील एका हॉटेलमध्ये आणि नंतर त्यांच्या जालन्यातील घरात डांबून ठेवल्याचा आरोप किरण खरात यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत नमूद केला आहे . त्यावरूनच विजय झोल, विक्रम झोल, सुभाष काकस, अनिरुद्ध शेळके, विजय भांदरगे, सुमित जाधव, गजानन तौर यांच्या विरुद्ध 16 जानेवारीला प्रथम घनसावंगी ठाण्यात गुन्हा नोंद होऊन नंतर तो जालन्यातील कदीम ठाण्याकडे वर्ग करण्यात आला होता .



## करदात्यांना दिलासा

आधुनिक केसरी

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांचा केंद्रीय अर्थमंत्री म्हणून सलग पाचवा अर्थसंकल्प सादर केला आहे. असे करणाऱ्या त्या स्वतंत्र भारताच्या फक्त सहाव्या केंद्रीय अर्थमंत्री ठरल्या आहेत. दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही अर्थसंकल्पाच्या आधी राष्ट्रीय स्तरावर अपेक्षांची जोरदार चर्चा पाहायला मिळाली. मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्मचा हा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प आहे. त्यामुळे काही राज्यांमध्ये होऊ घातलेल्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून त्याअनुषंगाने अर्थसंकल्पात घोषणा होतील, असेही बोलले गेले. मात्र, सर्वाधिक चर्चा होती ती अर्थसंकल्पात सामान्य करदात्यांसाठी कररचनेत नेमके कोणते बदल होणार? केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी याबाबत अर्थसंकल्पात मोठी घोषणा केली असून त्यानुसार नव्या आणि जुन्या करप्रणालीनुसार करदात्यांना दिलासा देण्यात आला आहे. दरम्यान, अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या घोषणांमुळे करदाते बुचकळ्यात पडल्याची प्रतिक्रिया विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. एकीकडे नव्या करप्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर दिलासा देण्यात आला असताना दुसरीकडे जुन्या करप्रणालीमध्ये मात्र अवघ्या ५० हजारांची वाढ करमर्यादेमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे नेमकी कोणती कररचना स्वीकारावी? या संभ्रमात करदाते सापडल्याचे संगितले जात आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये जुन्या आणि नव्या करप्रणालीसाठी वेगवेगळ्या घोषणा केल्या आहेत. यानुसार, नवीन करप्रणाली नागरिकांना लागू करण्यात आली असून जुनी करप्रणाली स्वीकारण्याचा पर्याय नागरिकांना उपलब्ध असणार आहे. अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेनुसार नव्या करप्रणालीमध्ये कमाल करपात्र उत्पन्नाची मर्यादा ५ लाखांवरून ७ लाख करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन करप्रणालीचा स्वीकार करणाऱ्या करदात्यांना ७ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागणार नाही. यासोबतच नव्या घोषणेनुसार कररचनेचे स्लॅब्सही बदलण्यात आले आहेत. गेल्या वर्षी जुन्या करप्रणालीसोबतच नवीन करप्रणालीची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली होती. मात्र, नव्या करप्रणालीला करदात्यांचा पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळेच या अर्थसंकल्पात अशा प्रकारे नव्या करप्रणालीमध्ये सूट देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. २०२०मध्ये केंद्र सरकारने अर्थसंकल्पात नव्या करप्रणालीची घोषणा केली होती. अल्प उत्पन्न गटातल्या नागरिकांना कराच्या बोजापासून सुटका होण्यासाठी ही प्रणाली जाहीर करण्यात आली होती. त्यासाठी या कररचनेमध्ये अनेक स्लॅब्जही जाहीर करण्यात आले होते. मात्र, या करप्रणालीला अपेक्षेइतका प्रतिसाद करदात्यांकडून न मिळाल्यामुळे त्यावर चर्चा सुरू झाली होती. याआधीच निर्मला सीतारमण यांनी दिल्लीत बोलताना स्पष्टीकरण दिले होते. करदात्यांना जर जुनी करप्रणाली जास्त सोपी आणि उपयुक्त वाटत असेल, तर ते जुन्या करप्रणालीचा पर्याय स्वीकारू शकतात. ती प्रणाली आपण रद्द केलेली नाही, असे निर्मला सीतारमण म्हणाल्या होत्या.

## कोचिंग संस्कृतीत शिक्षण संस्कृती बदलली

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपल्या देशातील शिक्षण व्यवस्था खूपच कमकुवत होती. हळूहळू बदल होऊ लागले, पण ९० च्या दशकापर्यंत शिक्षणाचे एकच केंद्र होते आणि ते म्हणजे शाळा. शाळेला आपण शिक्षणाचे मंदिर म्हणायचो. त्याकाळी विद्यार्थी शाळेतून घरी परतल्यावर गृहपाठ पूर्ण करायचे आणि जी मुलं कुणाची मदत घ्यायची किंवा कुणाकडून कोचिंग घ्यायची, त्याला समाजात चांगलं मानलं जात नव्हतं. शिकवणी शिक्षकांनाही समाजात तेवढा मान मिळत नव्हता. त्याकाळी अशा लोकांना शिक्षक नव्हे तर व्यापारी म्हटले जायचे कारण ते मुलांच्या पालकांकडून खाजगी कोचिंग देऊन पैसे कमवत असत, पण आज चित्र बदलले आहे.**

आज शालेय शिक्षण पद्धतीला समांतर शिकवणीची व्यवस्था उभी राहिली आहे. शालेय शिक्षण पद्धती समोर खाजगी शिकवणी एक आव्हान म्हणून उभे ठाकले आहे. खासगी शिकवनिमुळे शाळा महाविद्यालयं ओस पडत आहे. एका अभ्यासानुसार, भारतातील मुले ४ वर्षाच्या वयापासूनच अभ्यासासाठी शिकवणी घेण्यास सुरुवात करतात. म्हणजे लहानपणापासूनच ट्यूशनचे सूत्र मुलांच्या मनात बिंबवले जाते आणि त्यांना सांगितले जाते की जर त्यांनी शिकवणी घेतली नाही तर ते इतर मुलांपासून मागे राहतील आणि त्यांना पुन्हा कोणी विचारणार नाही.

आठवी इयत्तेत पोचेपर्यंत मुलांना शिकवणीचे व्यसन लागले आहे आणि येथूनच या उद्योगाचा विस्तार सुरू झाला. आठवीनंतर मुले वेगवेगळ्या विषयांची शिकवणी घेऊ लागतात. सरासरी, भारतात एखादा विषय शिकवण्यासाठी मासिक शुल्क ४०० रुपये आहे आणि बऱ्याच बाबतीत ते १,००० रुपयांपेक्षा जास्त आहे.पालक त्यांच्या एकूण उत्पन्नापैकी १२ टक्के मुलांच्या शिक्षणावर खर्च करतात. पालक प्रथम शाळेची फी भरतात, नंतर शिकवणी फी भरतात आणि अशा प्रकारे एकूण कमाईपैकी १२ टक्के रक्कम पालक मुलांच्या शिक्षणावर खर्च करता आणि मुलं शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना चांगल्या वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळतो. मग त्यासाठी त्यांना कोचिंगही घ्यावे लागेल. याशिवाय आयएएस आणि आयपीएस होण्यासाठी कोचिंग देखील घेतले जाते आणि एक कटू सत्य हे आहे की आज तुम्हाला कोणत्याही सरकारी खात्यात लिपिकाची नोकरी असेल तर तुम्हाला परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शिकवणी घ्यावी लागते.

म्हणजे आज जर तुम्ही तुमच्या मुलांना शाळेत पाठवले, त्यांना चांगल्या कॉलेजमध्ये दाखल केले, पण त्यांना शिकवणी वर्ग मिळत नसतील, तर हे शिक्षण त्यांच्यासाठी आयुष्यात प्रमाणपत्राशिवाय दुसरे काही नाही. म्हणजेच, आजशाळा-महाविद्यालयांमधील शिक्षणापेक्षा शिकवणीचे शिक्षण अधिक शक्तिशाली झाले आहे आणि ही शक्ती अनेक कंपन्यांसाठी नोटा छापण्यासाठी मशीनसारखी आहे, जी काही आकडेवारीवरून समजू शकते.भारतातील प्रत्येक चार मुलांपैकी एक मुलं अभ्यासासाठी त्यांच्या शाळेपेक्षा अधिक शिकवण्यांवर अवलंबून असतात. आपल्या देशात सुमारे ७ कोटी मुले खासगी शिकवणी घेतात.एका आठवड्यात, एक मूल त्याचे ९ तास शिकवणी वर्ग घेण्यात घालवतो. सोप्या शब्दात सांगायचे तर हा वेळ शाळेत दीड दिवसाच्या मुक्कामाइतका असतो.

भारतातील ज्या राज्यांमध्ये मुले सर्वाधिक खाजगी शिकवणी घेतात त्यात पश्चिम बंगाल अव्वल आहे. येथे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक म्हणजेच ९वी ते १२वी पर्यंतचे ८९ टक्के विद्यार्थी शिकवणीचा अभ्यास करतात. . अशा परिस्थितीत, या आकडेवारीवरून, तिथल्या शिक्षण व्यवस्थेची कल्पना येऊ शकते.मात्र, इतर राज्यांची स्थितीही या बाबतीत फारशी चांगली नाही. त्रिपुरामध्ये ८७ टक्के, बिहारमध्ये ६७.२ टक्के, ओडिशामध्ये ६३.४ टक्के आणि मणिपूरमध्ये ५४.७ टक्के मुले शिकवणी घेतात. एका सर्वेक्षणात, जेव्हा काही मुलांना शाळेतून घरी परतल्यानंतर ते शिकवणी का शिकतात, असे विचारले असता, त्यांचे उत्तर असे होते की त्यांच्या शंका शाळेत कधीच दूर झाल्या नाहीत आणि त्यामुळेच त्यांना शिकवणी घ्यावी लागली. म्हणजे हेही आपल्या व्यवस्थेचे मोठे अपयश आहे. इथे आणखी एक गोष्ट सांगता येईल की ती म्हणजे आज आपल्या देशात जर एखाद्या मुलाला विचारले की तुम्हाला चांगले शिक्षक कुठे मिळतात. ते शाळेत किंवा ट्यूशनमध्ये ? तर उत्तर असे की ते ट्यूशनमध्ये भेटतात.

या प्रकारच्या शिकवणीमध्ये प्रत्येक मुलाकडे लक्ष दिले जाते आणि त्या बदल्यात त्यांच्याकडून चांगले पैसेही घेतले जातात आणि पालकही आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी हा खर्च आनंदाने उचलतात, परंतु त्यांनी असे का



करावे? हे आपण समजुन घेतले पाहिजे.

शाळांमध्ये एका वर्गात ३० मुलांना एकत्र शिकवले पाहिजे, परंतु सरासरी ६० मुलांना शिकवले जाते, म्हणजेच एका वर्गातील शिक्षक एका वेळी ६० मुलांना एक विषय शिकवतो. अशा परिस्थितीत, बहुतेक मुलांना असे वाटते की त्यांना गर्दीत काहीही समजले नाही आणि त्यांच्या शंका दूर झाल्या नाहीत आणि म्हणूनच त्यांना शिकवणी मिळते, कारण शिकवणीमध्ये प्रत्येक मुलाच्या शिक्षणाकडे चांगले लक्ष दिले जाते. तात्पर्य, मुलांना शाळेतच सर्व गोष्टी समजल्या आणि त्यांना सर्व विषयांचे अचूक ज्ञान मिळाले, तर त्यांना शिकवणी घेण्याची गरज भासणार नाही. मात्र, यामागे आणखी एक कारण आहे आणि ते म्हणजे शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. सप्टेंबर २०२० मध्ये लोकसभेत अशी माहिती देण्यात आली होती की सध्या भारतातील सरकारी शाळांमध्ये १७ टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत. ही संख्या १० लाख ६ हजार आहे.कल्पना करा की शिक्षकांच्या इतक्या नोकऱ्या रिकाम्या पडल्या आहेत, पण आज जे बीएड शिकतात ते या शिकवणी केंद्रांना शाळांमध्ये शिकवण्यापेक्षा चांगला पर्याय मानतात आणि याचे कारण येथे जास्त पगार मिळतो. आज आपल्या देशातील शिकवणी उद्योग दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांचा झाला आहे आणि गेल्या ५ वर्षांत त्यात ३५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. म्हणजे शाळेतील मुले शिकवणीकडे अधिक वळू लागली आहेत. मात्र, आत्तापर्यंत आपणास जो काही खर्च सांगितला आहे, तो शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांशी संबंधित आहे.बारावीनंतरच्या विद्यार्थ्याला वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेची तयारी करायची असेल तर त्यासाठी त्याला वर्षाला सुमारे दीड लाख रुपये खर्च करावे लागतात आणि दोन वर्षे कोचिंग सेंटरमध्ये राहून तयारी केली तर त्याची किंमत ३ रुपयांच्या वर जाते. वस्तुस्थिती अशी आहे की आज आपल्या देशातील बहुतेक लोकांनी चांगले शिक्षण घेण्यासाठी शिकवणी हा एकमेव उपाय मानला आहे. स्पर्धेत मागे पडण्याची भीती जिथून सुरू होते तिथून कोचिंगची मानसिकता सुरू होते.

शाळांमध्ये, जेव्हा शिक्षक फक्त परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी शिकवतात. मग खासगी कोचिंगच्या बाहेर उभे असलेले हे मार्केटिंग अधिकारी प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांना कोचिंगच्या जादूची खरी माहिती देतात. दिल्लीचे लक्ष्मी नगर हे असेच एक क्षेत्र आहे जिथे अनेक कोचिंग संस्था आहेत. प्रत्येक कोचिंग इन्स्टिट्यूटची फी वेगळी असते आणि इथे प्रत्येक शिक्षकाचे दर वेगळे असतात. इथे येणाऱ्या मुलांना शिकवण्याचा उद्देश एकच असला तरी शाळा-कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलांना कोचिंगची अजिबात गरज का भासत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोचिंगला येणाऱ्या मुलांचा असा विश्वास आहे की स्वयंअध्ययन करता येईल, पण शाळा-महाविद्यालयांतील शिक्षक प्रश्नांच्या गोंधळात शंका दूर करत नाहीत आणि काही वेळा त्यांना पुस्तकी भाषा समजण्यात अडचण येते, त्यामुळे त्यांना कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये यावे लागते. कोचिंग फी भरण्यास सक्षम असलेल्या कुटुंबांना त्यांची मुले स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडू इच्छित नाहीत. या कारणास्तव ते कोचिंग संस्थांच्या दाव्यात अडकतात, तर सत्य हे आहे की अनेक मुलं कोचिंग इन्स्टिटयूटमध्ये शिकत असली तरी सगळ्यांनाच अव्वल क्रमांक मिळतो असं नाही, पण तरीही मुलांचा असा विश्वास असतो की चांगले शिक्षक हे शाळेचे चांगले शिक्षक असतात. कोचिंग इन्स्टिट्यूट आहेत, कॉलेज नाहीत. कोचिंग इन्स्टिट्यूटचे शिक्षकही असेच मानतात. किंबहुना, विद्यार्थ्यांच्या मनात असाही विचार आहे की शाळा-महाविद्यालयात शिकवणाऱ्या शिक्षकांना कितीही दिवस शिकवले तरी त्यांना पगार मिळतो आणि परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्यावर कोणतेही बंधन नाही, पण कोचिंग इन्स्टिट्यूटला विशेष उत्तीर्ण व्हावे लागते. परीक्षा. जबाबदारी आहे आणि त्यासाठी ते शुल्क आकारतात.

देशात शिक्षणाबाबत जनजागृती झाली असली तरी शिक्षकांच्या स्थितीत कोणताही बदल झालेला नाही. शिक्षकांची लाखो पदे रिक्त आहेत. बहुतांश शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केली जात आहे. ज्याच्या ज्ञानावर अनेक वेळा प्रश्न निर्माण होतात. स्पर्धा परीक्षांबाबत सरकारी यंत्रणा सुधारण्यावर कधीही चर्चा होत नाही. नवीन शैक्षणिक धोरण कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करते, परंतु स्पर्धात्मक परीक्षांमध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण प्रदान करत नाही. मात्र, कोचिंग संस्कृती केवळ भारतातच लोकप्रिय होत आहे, असे नाही. जागतिक शैक्षणिक जनगणनेनुसार, जपानमधील ७० टक्के विद्यार्थी, मलेशियामध्ये ८३ टक्के आणि दक्षिण कोरियामध्ये ९२.८टक्के विद्यार्थी शाळेव्यतिरिक्त खासगी शिकवणींची मदत घेतात. म्हणजेच ही समस्या केवळ भारतातच नाही तर अनेक देशांमध्ये खाजगी शिकवणी उद्योगाने मोठे रूप धारण केले आहे आणि २०२२ पर्यंत तो २२७अब्ज डॉलर्स म्हणजेच १६.५ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल.

या समस्येवर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे जोपर्यंत आपण आपली शिक्षण व्यवस्था बदलत नाही, शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारत नाही, विद्यार्थ्यांना प्रेरित करत नाही आणि शाळांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांची गुणवत्ता सुधारत नाही, तोपर्यंत कोचिंगची संस्कृती आपल्या संस्कृतीवर वर्चस्व गाजवत राहणार आहे.

## महाराष्ट्रातील ‘साडेतीन शक्तिपीठे आणि नारी शक्ति’ ठरली देशात भारी !

आधुनिक केसरी

**प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावरील पथसंचलनात महाराष्ट्राच्या वतीने यंदा सादर करण्यात आलेल्या ‘साडेतीन शक्तिपीठे आणि नारी शक्ति’ चित्ररथाला दुसरा क्रमांक जाहीर झाल्याचे वृत्त आहे निश्चितच महाराष्ट्राच्या दृष्टीने स्वागतार्ह आणि प्रेरणादायी अशीच गोष्ट आहे उत्तराखंडच्या चित्ररथाला प्रथम तर उत्तर प्रदेशने तिसरा क्रमांक पटकावला आहे. यावर्षी महाराष्ट्रासह १७ राज्यांची आणि विविध केंद्रीय मंत्रालयांची १० अशी एकूण २७ चित्ररथे कर्तव्यपथावर झळकली होती. महाराष्ट्र राज्याचे यापुर्वी ४० वेळा राजधानीत होणाऱ्या मुख्य पथसंचलनात चित्ररथ सादर केली आहेत.**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने राज्याच्यावतीने ‘साडेतीन शक्तपीठे आणि नारी शक्ती’ या संकल्पनेवर आधारीत चित्ररथ यंदा सादर करण्यात आला होता. या माध्यमातून नारी शक्ति, राज्यातील मंदिर शैली आणि लोककलाचा अमूर्त वारसा प्रदर्शित करण्यात आला होता. राज्यात कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची आई भवानी, माहूरची रेणुकामाता हे तीन पूर्ण शक्तपीठे आहेत. तर, वणीची सप्तशृंगी हे अर्ध शक्तीपीठ आहे.या शक्तिपींठांना स्त्री शक्तीचे स्त्रोत मानले जाते. हे शक्तीपीठ यावर्षी चित्ररथाच्या माध्यमातून कर्तव्यपथावर दर्शविण्यात आले होते. चित्ररथाच्या पुढील दर्शनीय भागात गोंधळी, देवीचा भक्त संबळ वाद्य वाजवित असल्याची मोठी प्रतिकृती दर्शवण्यात आली होती. समोरील डाव्या व उजव्या भागात पांरपरिक लोककलेचे वाद्य वाजविणारे आराधी, गोंधळी यांची मध्यम आकाराची प्रतिमा, त्यांच्यामागे फिरते मंदिर आणि यात साडेतीन शक्तिपीठांमधील देवींची प्रतिमा दर्शवण्यात आली होती.पोतराज आणि हलगी वाजविणारे देवीचे भक्तांची दोन मोठी प्रतिकृतीने सर्वांचे लक्ष वेधले होते. चित्ररथाच्या दर्शनी भागात लोककलाकार आराधी, भोपी, पोतराज लोककला सादर करण्यात आली. चित्ररथाच्या मागील भागास नारी शक्तिचे प्रतिनिधीत्व करणारी एक मोठी स्त्री प्रतिमा दर्शवण्यात आली होती. साडेतीन शक्तिपीठांचा महिमा सांगणारे “साडेतीन शक्तिपीठे दाखविती आम्हा दिशा.. गोंधळ मांडला गं आई गोंधळाला या ” या गीताच्या तालावर चित्ररथासोबत डावी व उजवीकडे नृत्य सादर करणाऱ्या कलाकारांनी सर्वांना भुरळ घातली होती !!

**राजू जाधव, मांगूर, जि.बेळगाव**



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# म्हणून आम्ही अंधश्रद्धेचे बळी

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३

भारतीय माणूस खूप श्रद्धाळू आहे. तो खूप भावनिक आहे. तो लवकर भावनेच्या आहारी जातो. आणि भावनेचा गुलाम होऊन बसतो.

बसमधून प्रवास करतांना आम्ही रस्त्याच्या कडेला एखादा शेंदूर लावलेला दगड दिसला की, लगेच हात जोडतो... त्या ठिकाणी त्या शेतमालकाला पुरलेले असते व बापाची आठवण रहावी म्हणून त्याच्या मुलाने त्याच्या दिवसाच्या कार्यक्रमाच्या दिवशी तो दगड शेंदूर लावून ठेवलेला असतो.(त्याचा तो बाप किती लोकांच्या मुंड्या मोडत होता हे त्यालाच माहित असते.) आम्ही फक्त रस्त्याच्या कडेला दिसलेल्या त्या शेंदूर लावलेल्या दगडाला बसमधून हात जोडत असतो. कशाचाच विचार न करता.. असे कितीतरी लोक मला बसमधून कुठेही हात जोडताना दिसतात. रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात तर अनेकांनी आपापल्या बापाच्या स्मृतीप्रित्यर्थ मंदिरे बांधलेली आहेत.... बसमधून नकळत त्या मंदिराकडेही आमचे हात वळतात..आणि लगेच हात जोडून मोकळे होतो... कारण आम्ही असतो श्रद्धेचे बळी..परंतु ही श्रद्धा आंधळी असते म्हणजे ती अंध असते. म्हणून त्या अंधश्रद्धेचे, त्या सवयीचे आम्ही बळी ठरतो.

रस्त्याने एखादी गाय जवळून गेली की, आम्ही लगेच तिला हात लावून हात हृदयाकडे नेतो.. तो असतो संस्काराचा भाग व नंतर होतो सवयीचा भाग. मी अनुभवलेला एक प्रसंग असा... परतूरला (एकोणीसशे पंच्यांशी) कॉलेजला असतांना सकाळी साडे सातला गावातून मोंढ्यात पायी पायी जावे लागे.. त्याच रस्त्यावरून गायीगुरांचा कळप दररोज जात असे. या गायीगुरांच्या कळपातून रस्ता काढत जात असायचो..एकदा रस्त्यावरून मी आणि माझा मित्र हरिभाऊ हिवाळे कॉलेजला जात होतो.. एकामागोमाग गायी म्हशी येत होत्या. आम्ही रस्ता काढत लगबगीने जात होतो. हरिभाऊ पुढे... मी दोनचार फूट मागे.. सवयीप्रमाणे हरीभाऊने जवळून जाणाऱ्या गायीला हात लावून हृदयाकडे नेला..त्याची कृती पाहून माझ्याही मनात तोच विचार घोळत असतांना मीही तीच कृती केली. मी हरिभाऊच्या चारपाच फूट मागे असल्याने गायीच्या पाठोपाठ लागूनच येणारी ती म्हैस होती..मी पुढे पहात जवळून जाणाऱ्या (गाय समजून) म्हशीच्या अंगाला हात लावून हृदयाकडे नेला होता. ही कृती नकळत झाल्यावर मला कुणी पाहिले का ? मागेपुढे पाहू लागलो..काही क्षण पश्चात्ताप होत होता, आपण हे जे केलं ते कुणी पाहिलं तर नाही ना..! माझ्याकडून असं घडल्याचं मित्राला सांगितलं सुद्धा नाही....मला माझंच हसू येत होतं..आणि इतरांचे पाहून केलेल्या त्या कृतीचा राग येत होता. पश्चाताप होत होता आणि मनाला अनेक प्रश्न पडू लागले. लोक करतात म्हणून आपणही तीच कृती करतो. यामागे काय लॉजिक आहे? काय फायदे, काय तोटे आहेत याचा आपण विचार का करत नाहीत?

"लागले वळण इंद्रिया सकळ" आमच्या मनाला आणि शरीराला अनेक कृतीचे वळण लागलेले असते. त्या कृतीच्या सवयीचे आम्ही गुलाम होऊन बसलेलो असतो...सवयीची ती गुलामगिरी नंतर मानसिक गुलामगिरी होऊन बसते.

आम्ही एवढे मानसिक गुलाम झालेलो असतो की, कुठल्याही घटनेची शहानिशा न करता त्यावर विश्वास ठेवतो..त्या विश्वासाचे रूपांतर श्रद्धेत होऊन जाते..आणि नंतर अतिश्रद्धेचे रुपांतर अंधश्रद्धेत होऊन जाते.

माणूस कितीही पहिलवान, बलदंड शरीराचा, धाडसी असला तरी तो आतून भित्रा असतो...नेहमीच तो कशाला ना कशाला तरी घाबरलेला असतो.. त्याच्या मनात कायम भिती असते; परंतु तो दाखवत नसतो.

असा हा भित्रा माणूस आपल्या शरीर रक्षणासाठी व सुखाच्या स्वार्थापोटी, कशावरही श्रद्धा ठेवतो. त्याची कुठे ना कुठे तरी श्रद्धा असतेच..! श्रद्धा कशावरही असते.. मग तो सजीव असो की,निर्जीव..तो माणूस असो की, दगड. जात असो की, धर्म. पक्ष असो की,संघटना त्याची अनेक गोष्टीवर श्रद्धा असते.

श्रद्धा आणि विश्वास या दोन्हीचं अगदी जवळचं नातं आहे. अगोदर विश्वास नंतर श्रद्धा... विश्वासाच्या पोटातूनच श्रद्धेचा जन्म होतो...विश्वास टाकण्या अगोदर आम्ही त्या त्या घटकाची, घटनेची खात्री करत असतो...खात्री ही आकर्षणाला भूललेली असते आणि सध्याचे हे युग झगमगाटाचे, बेगडी आकर्षणाचे आहे, आश्वासनाचे, जाहिरातीचे आहे... या जाहिराती च्या आकर्षणावर आमची श्रद्धा ठरते आणि इथेच आमची फसगत होते.

श्रद्धा ही आदरापोटी निर्माण होते; परंतु त्याच श्रद्धेचा अतिरेक झाला की, तिचे रुपांतर अंधश्रद्धेत होऊन बसते....सध्या आपल्या भारतात बरेच सुशिक्षित लोक, अडाणी लोक व उच्चशिक्षित लोक सुद्धा अंधश्रद्धेचे बळी ठरले आहेत.

गेल्या आठ दहा वर्षात चमत्कारी बाबा, भोंदूबाबा, ढोंगी बाबांचं भरपूर पीक आलंय..! या पाखंडी, ढोंगी, भोंदू लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे....म्हणजे यांचा कुणीतरी बोलविता धनी आहे..इथला भोळा-भाबडा, भावनिक माणूस पार प्राचीन काळापासून लुबाडल्या जात आहे... आता लुबाडणाऱ्यांचाच एक धर्म होऊन बसला आहे.




अलिकडे तर एक कोणीतरी धीरेंद्र नावाचा तरूण भोंदू हा स्वतःला शास्त्री अन् पंडित म्हणवून घेतोय..त्याने तर चमत्काराचा उच्छादच मांडलाय.. त्या चमत्कारी पाखंड्याने कहरच केलाय.. तो एकटाच त्याच्या समर्थकांसह भारताला हिंदुराष्ट्र करायला निघालाय म्हणे..! तो जर स्वतःला शास्त्री आणि पंडित म्हणवून घेत असेल... तर त्याला माहिती असायला पाहिजे की, भारतात इसवीसनाच्या पूर्वीपासूनच इथे जैन धर्म आहे, बुद्ध धर्म आहे, नंतर सिख धर्म, ख्रिस्ती धर्म, मुस्लीम धर्म, लिंगायत धर्म, सत्यशोधक धर्म, शिवधर्म असे धर्म निर्माण झाले आहेत अलिकडे माहित झालेला सनातन धर्म आहे. वारकऱ्यांचा भागवत धर्म, चक्रधर स्वामींचा महानुभाव पंथ. असे अनेक धर्म आणि पंथ आहेत...आणि यातून सुटलेले किती लोक असतील जे स्वतःला हिंदू समजत असतील... त्या लोकांना घेऊन हिंदुराष्ट्र निर्माण करणारा धीरेंद्र शास्त्री..
आता उघडा पडलाय. त्याने तर संत तुकाराम महाराजांच्या प्रपंचावरही गरळ ओकली म्हणे....इथे लाखो वारकरी बांधव संत तुकाराम महाराजांच्या एकाच अभंगातून मिळालेल्या तत्वाच्या शिदोरीवर आयुष्य काढत आहेत.. ढोंगी लोकांना तर संत तुकाराम महाराजांचे नाव घेण्याचाही अधिकार पोहचत नाही.

बाबांवर श्रद्धा ठेवणाराची संख्या कमी नाही... हे ढोंगी बाबा काहीतरी चमत्कार दाखवून अज्ञानी लोकांना आकर्षित करतात...अशा चमत्कारावर श्रद्धा ठेवणारे लोक खूप आहारी जातात. ते सर्वकाही त्या भोंदू बाबांवर सोडून देतात. आपलं आयुष्य, आपलं भविष्य. आपला प्रपंचच बाबाच्या आशीर्वादाने चालतो..बाकी सब झूठ..! अशी त्यांची मानसिकता झालेली असते. अशा भोळ्या भाबड्या लोकांना कितीही ज्ञानाचे डोस पाजले तरी त्यांची भोंदू बाबांवरील श्रद्धा कमी होत नाही..

पाच सहा दिवसापूर्वी एका हॉटेलमध्ये खेड्यातील दोन तरूण सध्याच्या बाबाबुवांच्या विषयावर बोलत होते...मी गपचूप ऐकत होतो... त्यांच्या संवादातून एकाचं नाव सुनील आणि दुसऱ्याचे नाव प्रकाश असल्याचे कळाले होते. त्या दोघांचा मस्त संवाद रंगला होता...शेवटी सुनील प्रकाशला म्हणाला,"पक्या ते जाऊ दे.. मला मुलगा झालाय त्याचं नाव ठेवायचंय छोटुसा कार्यक्रम हे. आज संध्याकाळी तू ये. बरं.! बरं.. मला सांग पोराचं नाव काय ठेवू रं ?
प्रकाशने लगेच सांगितले, "आरं ठेव ना धीरेंद्र, नरेंद्र, देवेंद्र असं काहीतरी..?
जाय ना बे भाडखाऊ लोक त्याला मोठं झाल्यावर लई शिव्या देतीन ना..! बरं सांच्याला ये घरी.".. म्हणत सुनील निघून गेला.

स्वतःला पंडित, शास्त्री, बाबा म्हणवून घेणारे आणि समाजाची दिशाभूल करणारे, चमत्कार दाखवत भविष्य सांगून लूटणारे खूप झालेत.. यांच्यापासून समाजाने सावध राहिले पाहिजे. एक दृष्टांत सांगतो,
एके दिवशी सकाळीच एका खेडेगावावरून दुसऱ्या खेड्यात जाणारा एक वेगळीच वेशभूषा असलेला ज्योतिषी हातात कंदील घेऊन जात होता. तेव्हा त्याला हातात काठी घेऊन गावातून शेताकडे येणारा एक आडमूठ शेतकरी भेटला.. त्या ज्योतिषाला म्हणाला,"असा दिवसाच कंदिल लावून कुठे निघालावं ?"
मी विद्वान पंडित आहे, शास्त्र सांगतो, अगदी अचूक भविष्य सांगतो.. सांगू काय तुमचे ?"
तो आडमूठ शेतकरी म्हणाला, नको कालपासून महे बैलं खुट्यावर उपासी हैतं त्यायला चारायला न्याचंय..!"
तेव्हा ज्योतिषांने शेतकऱ्याला आग्रह करून करून भविष्य ऐकायला रस्त्यातच बसवले... शेतकऱ्याला ज्योतिषाचा खूप राग आला आणि म्हणाला, "हे ज्योतिषा हे माझ्या हातात काय आहे ? ज्योतिषी म्हणाला, "काठी.!"
शेतकरी म्हणाला, "आता ही काठी मी तुझ्या कोणत्या भागावर मारणार आहे ? सांग? असं म्हणताच ज्योतिषी म्हणाला," राजेहो ते कसं सांगू ? मंग तुला कोणतं भविष्य कळतंय..?
निघ लवकर इथून.. मला राग आणू नको..!
शास्त्री, पंडित, भविष्यवेते म्हणवून घेणाऱ्या आणि चमत्कार सांगणाऱ्याची चांगलीच जिरवणारे लोक तयार झाले पाहिजे.. तेव्हा महाराष्ट्रच नव्हेतर संपूर्ण भारत अंधश्रद्धामुक्त होईल...!



# धर्म आणि अध्यात्म

आधुनिक केसरी

धर्म माणसाला कर्म शिकवतो तर अध्यात्म माणसाला जीवन म्हणजेच जगणं शिकवतं. धर्म आणि अध्यात्म या बाबत एकतर कर्मठपणा दाखवला जातो किंवा टोकाचा विरोध केला जातो. धर्म आणि अध्यात्म यांची निर्मिती अशा काळात झाली कि आपण त्याचा विचारही करू शकत नाही. काही लोकं धार्मिक कर्मठपणा दाखवतात याचा अर्थ त्यांना बदल नको आहे. पण बदल हा तर निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे बदल नाकारून एकप्रकारे आपण निसर्गालाच आव्हान देत असतो हे कर्मठांच्या गावी ही नसते. तर टोकाचा विरोध करणाऱ्यांना फक्त बदल हवा असतो. त्यासाठी त्यांना कुठलेही बंधन नको असते. पण कुठल्याही बंधनाशिवाय बदल म्हणजे स्वैराचार हे त्यांना अवगतही नसते. त्यामुळे कर्मठपणा आणि धार्मिक विरोध या मधला सुवर्णमध्य साधला गेल तर धर्म आणि अध्यात्म जीवनाचे सुत्र बनेल यात वादच नाही. ध्यान,संमोहन, प्राणायाम, योग वगैरे गोष्टींकडे आपण फक्त धर्म या नजरेतून बघतो पण पाश्चात्य देशात या गोष्टींचा सहज स्विकार केला जातो आणि त्यासाठी आपल्या धार्मिक ग्रंथांचे संदर्भ ही दिले जातात.



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# लोकांना चमत्कार पाहिजे

आधुनिक केसरी

**माणूस हा खुपचं विचित्र प्राणी आहे.आजारी असला कि वैद्य किंवा दवाखाना शोधतो. भौतिक सुबत्ता प्राप्त होण्यासाठी मंदिर संत चमत्कार शोधत असतो.पण जीवनाचा खरया अर्थाने उद्धार होईल असे संत आपल्याला लवकर समजतं नाहीत सापडत नाहीत हे संतांचं नाही तर आपलं दुर्भाग्य आहे. सत्य हे समजण्यासाठी उमजण्यासाठी पचण्यासाठी कठिणच असतं. या उलट असत्य खुप लवकर समजतं खुप लवकर उमजत पचण तर क्षणात होऊन अंगवळणी पण पडतं.**

म्हणजे बाब कोणतीही असेल सत्य आणि असत्य या नुसारच त्या बाबीच महत्व अभाव प्रभाव असतो. पण तो समजण्यासाठी अगोदर फरक समजण गरजेचं असतं.आस्था श्रद्धा, ही वेगळी असते .त्याला निस्वार्थ भाव हि जोड असते. हेतू उदेश मग तो कोणाताही असेल लाभ, स्वार्थ भीती या पैकी येणकेन कोणतही कारणाने आपण जेव्हा मंदिर शोधतो कि संत शोधतो तेव्हा त्या भिती पोटी मंदिरात जाण वेगळं काही अपेक्षा डोक्यात असणं संकटं समोर उभा असण किंवा संकटाची अडचणीची चाहुल लागण अशा आपल्या कडे असणाऱ्या सर्व शक्तिचा प्रभाव अपुरा पडला कि आपण दैव शक्ति शोधतो. दैव शक्ति शोधताना मग मंदिरा समोरच सोबतच आपल्याला आपली समस्या अडचण क्षणार्धात सुटेल असे संत अपेक्षित असतात. यातूनच आपण चमत्काराची अपेक्षा बाळगतो . मुळात जीवनाचा खरया अर्थाने उद्धार होईल असे संत आपल्याला लवकर सापडत नाहीत आणि सापडले तर कळत नाहीत आणि कळले तर पचत नाहीत हिच विद्यमान युगाची खुप मोठी दुर्भाग्य पुर्ण स्थिती आहे. कर्म भोग या सृष्टी वर कोणालाही चुकणार नाहीत जसं कर्म तसं फळ आणि याच दरम्यान कर्म करताना काळा आपला साथीदार असतो. जीवनाच्या मार्गावर अनेक भौतिक सेवा सुविधा अर्जित करताना अनेक इच्छा पुर्ण होऊ शकतात अनेक इच्छा अपुरया राहु शकतात आणि भौतिक जीवनातील संसाधन निर्माण करण्यासाठी आपण अनेकदा अध्यात्माशी जोडले जाते. तर अनेक अपयशाचा सामना केल्यानंतर आपल्याला चमत्काराची अपेक्षा असते तेव्हा आपण या बाबींशी जोडले जातो. एखादी आपल्या जीवनातील घटना घडामोड हि घडणारच असते .पण एवढा संयम आपल्याकडं नसतो . ज्याठिकाणी आपल्याला संयम आणि आश्वासन आणि आशिर्वाद मिळतात याला आपण चमत्कार समजतो. वास्तविक मंदीर कोणतही असु द्या त्या ठिकाणी प्रचंड सकारात्मक उर्जा असते .संत कोणतेही असतील त्यांच्या कडे प्रचंड अशी सकारात्मक शक्ति असते . नकारात्मक कोणत्याही शक्तिला वाव नसतो . त्या अनुषंगाने अनेक ठिकाणी आपण खूप मोठ्या आशेने पोहचल्यावर आपल्या इच्छा योगायोगाने पुर्ण होतात. इथं पर्यंत आक्षेपार्ह कहीच नाही. पण दैनंदिन श्रद्धेला जेव्हा चमत्कारांचे भास होतात आणि आपलं जीवन बदल पाहिजे, पैसा सत्ता संपत्ती प्रतिष्ठा, नावलौकिक यासाठी, देवाचे आशीर्वाद किंवा संत कृपा झाली पाहिजे.मग इथूनच एक वेगळा प्रवास सुरू होतो आणि हा स्वार्था ने सुरु झालेला प्रवास एक वेळी एका बिंदूवर येऊन थांबतो आणि तिथुनच मग वेगळी ठिणगी पडते .आणि त्याला वादाची फसवणूकीपासून अनेक आरोप प्रत्यारोपाची किनर लागते. पण मुळात आपल्याला काय शोधणे गरजेचे आहे आणि आपण काय शोधतोय आपण जे शोधतोय ते आपल्याला तसंच मिळणार आहे. आपला मुळात शोध चुकीचा आहे आणि चुकीच्या मार्गाने पद्धतीने आपण योग्य मार्ग शोधतोय हे गणित स्वप्नात सुद्धा जुळण्यासारखे नाही ते आपण वास्तवात जुळतोय म्हणजे आपण किती विद्वान ज्ञानी पंडित आहेत. मुळात आपला जन्म कशासाठी झाला आहे हे समजलं पाहिजे आणि संत हे आपल्याला आपल्या जीवनाची खरी ओळख करून देतात आणि जीवनाचा आत्म उध्दार होण्यासाठी याचे अर्थ अध्यात्म आणि संत परंपरा हि चुकीची नाही तर मुळात आपण चुकीच्या ठिकाणी पोहचता कामा नये. मुळ अध्यात्म हा प्रांत वेगळा आहे .हे सर्व सामान्य लोकांना कळल्याशिवाय खरं संत कळणार नाहीत आणि सापडणार पण नाहीत. पण वास्तविक गरज हिच आहे कि खरे संत समजले



मार्गदर्शन करत असतात. पण सध्या माणसं आर्थिक सुबत्ता आणि जीवनातील समस्या यासाठीच जास्तीत जास्त आकर्षित होत आहेत आणि इथुनच नविन धार्मिक युग निर्माण होत आहे. या नवयुगात कही घटना घडामोडी वेगवेगळ्या पद्धतीने घडू शकतात पाहिजेत कळले पाहिजेत.

**(लेखक वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष, तथा वंजारी समाज ईतिहास अभ्यासक व लेखक बालसंस्कार शिबिर अध्यात्मिक मार्गदर्शक आहेत.)**

# अंतराळ परी : भारतकन्या कल्पना चावला



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**मी विशिष्ट प्रदेशाचा, देशाचा ही भावना गळून पडण्यासाठी ताऱ्यांकडे बघा; कारण तेव्हा तुम्ही एका अवकाशाचे झालेले असता.." अश्यापद्धतीने अहंकार गळून पडण्यासाठी समानतेचा बोध घेण्यासाठी ताऱ्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन दर्शविणारी भारतीय वंशाची अंतराळवीर कल्पना चावला यांनी म्हटले आहे.हरियाणा राज्यातील कर्नाल या ठिकाणी जन्मलेल्या कल्पना चावलाला लहानपणापासून अंतराळात जाण्याची स्वप्न रंगवीत होत्या.**

वडील बनारसीलाल यांना मुलीने डॉक्टर वा शिक्षक व्हावे ही तीव्र इच्छा होती पण मुलगी आठवीत असतांना इंजिनिअर होण्याचे शिक्षकांना बोलून दाखविले. कल्पना चावला यांना चार भाऊ व बहिनीपैकी सर्वात लहान असल्याने सर्वांची लाडकी होती. बालपणीच मुलांसोबत दंगा, मौजमजा करण्यात पटाईत होती. आपल्या भावाशी सायकलवर ट्रिप काढण्याचा छंद. तिची आवड,जोश व स्वप्न पूर्ण करण्याचा अट्टाहास हा इतरांसाठी प्रेरणादायीच. आज निधनानंतरही सर्वांच्या हृदयात स्थान निर्माण करणारी अंतराळवीर कल्पना चावला प्रेरणास्थान आहेत.

अंतराळवीर कल्पना चावला यांचा जन्म १७ मार्च १९६२ साली झाला.प्राथमिक शिक्षण कर्नाल टागोर स्कुलमध्ये झाले. वैमानिक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंजाब इंजिनिअरिंग कॉलेजमधून वैमानिक इंजिनिअरिंग मध्ये पदवी प्राप्त केली. मुलींना उंबरठा ओलांडण्यासाठी विचार करावा लागतो त्याठिकाणी अंतराळात झेप घेण्यासाठी टेक्सास युनिव्हर्सिटीमधून वैमानिक इंजिनिअरिंगची मास्टर्स पदवी पूर्ण केली. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था (NASA) येथे त्यांची प्रथमतः निवड झाली. झालेली निवड सार्थ करून अनेक संशोधनपर रिसर्च लिहिले नि सर्व चर्चेत राहिले. कल्पना चावला यांच्यातील अंतराळवीर साठी असणारा ज्ञान,उपयोजन व कौशल्याचा पुरेपूर फायदा घेतला.१९८८ साली प्लुड डायनॅमिक्समध्ये काम करायला सुरुवात केली.

ओव्हरसेट मेथड मध्ये उपप्रमुख म्हणून देखील काम बघितले. १९९४ साली NASA (THE NATIONAL AERONAUTICS AND SPACE ADMINISTRATION)मध्ये संभाव्य यादीत नाव समाविष्ट करण्यात आले.१९९५ मध्ये जॉनसन ऑरोनाटिक्स सेंटरमध्ये निवड झाली.नोव्हे १९९६ मध्ये "ATS-87" मिशनची प्रमुख जबाबदारी कल्पना चावला यांच्याकडे दिल्या गेली.या मोहिमेत प्रथमतः अंतराळात झेप घेणारी भारतीय वंशाची पहिली महिला वैमानिक ठरली.त्यावेळी १९ नोव्हेंबर १९९७ ला ३७६ तास आणि ३४ मिनिटे अंतराळात राहण्याचा मान मिळविला.२५२ फेऱ्या पृथ्वीला घातल्या नि १ कोटी ४६ हजार किलोमीटरचा प्रवास करून यशस्वीरीत्या पृथ्वीवर पोहचले. अंतराळवीर भरतकन्या कल्पना चावला अमेरिकेत गेल्यानंतर वैमानिक प्रशिक्षक जीन पियरे टारिसन यांच्याशी ओळख झाली. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाली.फ्रेंच व्यक्तीशी १९८४ साली कल्पना चावला यांच्याशी विवाह झाला.जेपी यांच्याकडून वैमानिक, स्कुबा ड्रायव्हिंग यासारखे खेळ शिकल्या.ATS-87 ची यशस्वी मोहीम पार पडल्यानंतर अंतराळात जाण्यासाठी सात सदस्यीय अंतरळवीरांची टीम तयार झाली.




कोलंबिया यान हे अंतराळात झेपावले.ते अभियान पूर्ण करून पृथ्वीकडे येतांना अघटित घडले.२२ मिनिटात कोलंबिया यानसह सर्वजण पोहचणार पण ८ वाजून ५४ मिनिटांनी यानाचा व नियंत्रण कक्षाचा संयम सुटला. कोलंबिया स्पेस शटलचा अपघात झाला आणि त्याच यानात असलेल्या भारतीय वंशाची पहिली महिला अंतराळवीर यांचा १ फेब्रुवारी २००३ साली निधन झाले. अंतराळात झेप घेणारी परी निवर्तनामुळे अवकाश संशोधनाची अगणित हानी झाली. मरणोपरांत तिला "कॉंग्रेशनल स्पेस मेडल ऑफ ऑनर" हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.अंतराळवीर कल्पना चावला यांच्या निधनाची वार्ता ऐकून कराड मधील विज्ञान शिक्षक दुःखी झाले.

कल्पना चावला यांच्या आई-वडिलांची परवानगी घेऊन कराड येथे "कल्पना चावला विज्ञान केंद्र" उभारले.कल्पना चावला यांच्या नावाने असे उभारलेले हे पहिलेच केंद्र असून तिच्या वडिलांनी व बहिणीने आर्थिक सहकार्य देखील केले आहे.आजच्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अवकाश संशोधन बाबत अधिक जाणीवजागृती होऊन अंतराळवीर घडावे,त्यातून प्रेरणा मिळावी हाच तेथील उदात्त हेतू आहे. अंतराळवीर कल्पना चावला यांच्या कार्याला व लढाऊ स्वभावाला विनम्र अभिवादन!!!!

# जागतिक मराठी संमेलन, ‘शोध मराठी मनाचा’

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून...)**

बंधु भगिनींनो, आता थोडं देशांतर्गत डोकावून बघू. महाराष्ट्र नेमका कुठे आहे? उद्योग, अर्थव्यवस्था, माध्यमे, क्रीडा, विज्ञान व तंत्रज्ञान यात महाराष्ट्र नेमका कुठे आहे?



डॉ. ज्ञानेश्वर मुळे

स्वातंत्र्याच्या लढाईत महाराष्ट्र पुढे होताच. अगदी पानिपतचे युद्ध व त्यानंतर 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध आणि नंतर आलेली स्वातंत्र्य चळवळ सर्वांमध्ये महाराष्ट्र बलिदान देण्यात पुढे होता. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक सुधारणांच्या बाबतीतही महात्मा फुले, कर्वे, आगरकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज, आंबेडकर, सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील अशी किती नावं घ्यावीत? स्वातंत्र्यानंतरच्या काळातही हमीद दलवाई, बाबा आढाव, नरेंद्र दाभोळकर अशी सामाजिक नेतृत्वाची परंपरा सुरू राहिली. आज देश एका विचित्र वैचारिक वावटळात सापडला आहे. यातून बाहेर पडून नवीन मार्ग कोण दाखवू शकेल, हा प्रश्न मला पडतो. तंत्रज्ञानामुळे आणि त्यातून विकसित केल्या गेलेल्या ॲपमुळे समस्या सुटण्याऐवजी अधिक गंभीर होत चालली आहे.

माध्यमांमध्ये विशेषतः इंग्लीश माध्यमे आणि टी.व्ही. माध्यमांत अँकर म्हणून किंवा प्रतिभागी म्हणून मराठी माणूस दिसत नाही. मराठी माणसाचे इंग्रजी टी.व्ही. चॅनेल असले, तरी मला त्याची कल्पना नाही. इंग्रजी मुद्रित माध्यमांमध्येही मराठी स्तंभ लेखक किंवा पत्रकारांची उपस्थिती जुजबी किंवा नगण्य आहे. एकेकाळी हिंदी सकट अनेक राष्ट्रीय वृत्तपत्रांचे संपादक मराठी होते. आता ते युग संपल्यासारखे वाटते. आज महाराष्ट्राविषयी आणि मराठी माणसांविषयी लिहिणारे बहुतेक लोक अमराठी आहेत. एकेकाळी महाराष्ट्रातील भांडारकर व अन्य संस्था संशोधनात अग्रेसर होत्या. आज समकालीन इतिहासकारांमध्ये राष्ट्रीय पातळीवर नाव घ्यावे असे मराठी अभ्यासक नाहीत. जे आहे ते प्रादेशिक पातळीवर व मुख्यतः प्रादेशिक भाषेत लिहिताहेत. हे सांगण्याचा उद्देश असा की महाराष्ट्राचे विचार, मतमतांतरे, राष्ट्रीय पातळीवर पोहोचवू शकणाऱ्या पत्रकारांची खूप मोठी वानवा आहे. जसे पत्रकारांचे, इतिहासकारांचे तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय पातळीवर मूलभूत संशोधन करून नवीन योगदान केलेल्या मराठी माणसाचे. महाराष्ट्रातील एकाही व्यक्तीला कोणत्याही शाखेत नोबेल पुरस्कार मिळवता आलेला नाही किंवा इतर क्षेत्रातला तत्सम - सन्मान वाट्यास आला नाही. शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची प्रचंड प्रगती झाली आहे हे खरे, पण गुणवत्तेत आपण मागे पडलो की काय? असा विचार मनात येतो.

क्रिडाक्षेत्रात ऑलिंपिकमध्ये खाशाबा जाधवांच्या पहिल्या वैयक्तिक पदकानंतर महाराष्ट्राच्या वाट्याला एकही पदक आले नाही. क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर आणि सुनिल गावस्कर यांच्यानंतर त्या उंचीची अजून प्रतिक्षा आहे. महाराष्ट्रात बॉलीवूड असले तरी बॉलीवूडमध्ये महाराष्ट्र गोवारीकर, भांडारकर, मांजरेकर यांच्या चढतीच्या काळानंतर आता कसा दिसणार? मात्र नागराज मंजुळेंच्याकडून आम्हा सर्वांच्या अपेक्षा खूप उंचावल्या आहेत.

ज्यांची भरपूर संपत्ती आहे अशा सर्वाधिक 25 श्रीमंत व्यक्तींमध्ये एकही मराठी नाही. औद्योगिक क्षेत्रात सर्वात पुढे असलेला महाराष्ट्र टॅक्स गोळा करण्याचा बाबतीत देशात सतत पहिल्या क्रमांकावर असतो. 2021-22 मध्ये आपल्या राज्याचे योगदान 5,24,498 कोटी रुपये होते. क्रमांक दोनवरच्या दिल्लीचे योगदान 17,724 कोटी रुपये होते. याउलट केंद्राकडून येणाऱ्या आर्थिक वाट्यामध्ये महाराष्ट्राला फक्त 6.3% तर उत्तर प्रदेश 17.23%, बिहार, 10.78% आणि पश्चिम बंगालला 7.5% इतकी संपत्ती येते. याचा अर्थ इतर राज्यांच्या विकासात महाराष्ट्र सढळ हाताने मदत करत आहे. मला तर ‘कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे’ हे गाणेच आठवते.

राजकारणाविषयी मी बोलणार नाही. पण सत्तेतील महाराष्ट्राच्या वाट्याबद्दल थोडं सांगणं भाग आहे. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत महाराष्ट्राने देशाला पंतप्रधान दिलेला नाही. केंद्रातील साऊथ ब्लॉकमधील संरक्षण मंत्रालय व विदेश मंत्रालय तसेच नॉर्थ ब्लॉकमधील गृह मंत्रालय आणि अर्थ मंत्रालय ही चार मंत्रालये हेच सत्तेचे केंद्र मानले जाते. तिथे महाराष्ट्राचे शेवटचे संरक्षणमंत्री शरद पवार 1991 - 93 पर्यंत होते. त्यानंतर 1996 मध्ये 15 दिवस प्रमोद महाजन होते. यशवंतराव चव्हाण हे 1974 - 77 पर्यंत शेवटचे मराठी विदेशमंत्री होते. 2012-14 पर्यंत सुशीलकुमार शिंदे हे शेवटचे मराठी गृहमंत्री होते व 1989-90 पर्यंत मधू दंडवते हे शेवटचे मराठी अर्थमंत्री होते. या माहितीवरून केंद्रातील सत्तेत गेल्या काही दशकातील मराठी वाटा नेमका किती आहे हे सहज लक्षात येईल. आणि हे एकदा कळाले की महाराष्ट्राची पीछेहाट कशी होते आहे? का होते आहे? याचाही बोध होऊ शकेल किंवा सर्व प्रकारच्या अटी पूर्ण होत असूनही मराठी अभिजात भाषा आजपर्यंत का होऊ शकली नाही हेही कळेल.

हे सगळं मी तुम्हा सर्वांना निराश करण्यासाठी सांगत नाहीये. तर स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचं योगदान देणाऱ्या आपल्या राज्याचं भविष्य काय आहे याचं मंथन व्हावं यासाठी सांगत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्र खूप आत्मकेंद्री आणि आत्मसंतुष्ट राहिलेला आहे. राष्ट्रीय किंवा वैश्विक दृष्टी बाळगणारे अभ्यासक, विचारवंत आणि समाज धुरीणांची संख्या रोडावलीय. संसदेत मराठी बोलता येतं, पण प्रभाव हिंदी किंवा इंग्रजीचा पडतो, ही वस्तुस्थिती आहे. आजच्या काळाजी गरज ओळखून मराठी माणसाने आत्मविश्वासानं पुढची पावलं उचलली पाहिजेत. माझ्या अल्पमतीप्रमाणे मी काही पावलं सुचवू इच्छितो.

## अध्यक्षीय भाषणाचा सारांश

शोध मराठी मनाचा २०२३

(1) अगदी अलीकडच्या काळापर्यंत ‘मराठा’ हा शब्द ‘समस्त मराठी समाज’ अशा अर्थाचा समूहवाचक होता. आज हा शब्द जातिवाचक झाला आहे. फुले आणि आंबेडकरांच्या या भूमीत माणूस जातवार वाटला जाणं ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. गावोगावी जातीपातीच्या नावावर विद्वेष वाढवणे सुरू होऊन आज त्याचे प्रतिबिंब राज्यस्तरीय आणि देशस्तरीय पातळीवर पडताना दिसते. या विषयाला धाडसाने हात घालून नवी दृष्टी देण्याचं सामर्थ्य महाराष्ट्र दाखवू शकेल का?

(2) आपल्या महाराष्ट्र गीतांमध्ये आणि राजकीय भाषणांमध्ये ‘अटक ते कटक’ अशा मराठी साम्राज्याच्या उत्कर्षाचा वारंवार उल्लेख येतो. प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्र संकुचित होत चालला आहे. आपल्या उज्ज्वल इतिहासाची गौरवगाथा गात असतांना संपूर्ण भारतभर पसरलेले मराठी इतिहासाचे अवशेष जपण्याकडे मात्र आपले लक्ष नाही. बनारसमधले झाशीच्या राणीचे घर असो किंवा आग्र्यातील शिवछत्रपती आणि शंभूराजे यांच्या नजरकैदेची ठिकाणे असोत, देशभर पसरलेल्या या वास्तू जपणे, इतिहासाची योग्य नोंद करणे करणे, त्या त्या ठिकाणी स्मारके उभारणे हे कार्य तातडीने करणे आवश्यक आहे. तरूण इतिहासकारांनी यात पुढाकार घेणे गरजेचे आहे. शासनाने मदत करणे ही सुद्धा काळाची गरज आहे. हे कार्य केले नाही तर मुळातच अस्पष्ट होत चाललेला साम्राज्याचा इतिहास अधिकच धूसर होत जाईल.

(3) विदेशात 30-40 देशांमध्ये मराठी माणूस आहे. त्यांच्यात त्या त्या देशांचे नेतृत्व करण्याची कुवत येत आहे. जपानमध्ये तोक्यो-एदोगावा महापालिकेत योगेंद्र पुराणिक हा मराठी तरूण निवडून आला आहे. तो त्या देशात निवडून आलेला पहिला भारतीय आहे. श्री ठाणेदार हा बेळगावकर अमेरिकेच्या मिशिगन राज्यातून आमदार म्हणून निवडून आला आहे. अमेरिकेत वेस्ट विंडसर शहरात हेमंत मराठे महापौर म्हणून निवडून आलेत. मॉरीशसमध्ये अलन गानू हे मराठी वंशाचे गृहस्थ गेली कित्येक दशके राजकारणात आहेत. नऊ वेळा ते खासदार म्हणून निवडून आलेत आणि आजही ते वाहतूक आणि रेल्वे मंत्री आहेत. लिओ वराडकर ही मराठी व्यक्ती आज आयर्लंडची पंतप्रधान आहे. या व्यक्तींच्या कार्याचा महाराष्ट्र यथोचित परिचय केव्हा करून घेणार? त्यांचा सन्मान आपण केव्हा करणार? इतर कामं राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात एन.आर. आय. मंत्रालय असणे ही नितांत गरज आहे. आपण दर्यावर्दी आहोत हे आपल्या नव्या पिढीला समजायला नको का?

इतिहासाचे योग्य आकलन झाले नाही तर उरतात फक्त घोषणा. त्यामुळे मराठी साम्राज्य जिथे बळकट होते अशा तंजावर, बडोदा, इंदूर इतकेच काय लाहोर अशा ठिकाणच्या मराठी इतिहासाची स्वतंत्र पुस्तके शिवाय त्या ठिकाणी आज असणाऱ्या मराठी समाजाच्या डॉक्युमेंटेशनची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी ही जबाबदारी उचलली पाहिजे.

(4) विदेशातील कोलंबियासारख्या पाच विद्यापिठांमध्ये मराठी इतिहास भाषा व संस्कृती यांची अध्यासने निर्माण केली पाहिजेत. भारतातील सर्व विद्यापीठात नसेना का निदान प्रमुख 20 विद्यापीठांमध्ये मराठी अभ्यासाची केंद्रे तयार केली पाहिजेत. शासनाने ठरलेली रक्कम जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला न दिल्याने प्रस्तावित अध्यासन अजूनही मूर्त स्वरूपात आले नाही असे समजते.

(5) दिल्लीतील सर्व मराठी अधिकाऱ्यांना एकत्र आणणारी ‘पुढचे पाऊल’ या संस्थेची स्थापना मी 2016 ला केली आहे. भारतभर आणि विदेशात आता शेकडो मराठी मंडळे मराठी भाषा व संस्कृती यांचे जतन करताहेत. त्यांना प्रोत्साहन देणारी योजना शासनाने आखली पाहिजे. मराठी नेते, विचारवंत, उद्योजक जेव्हा बाहेर जातात तेव्हा या मंडळांना भेटी दिल्या तर ते दोघांच्याही हिताचे ठरेल.

(6) मराठी माणूस आजकाल राष्ट्रीय विषयांवर व्यक्त होताना दिसत नाही. महाराष्ट्र म्हणजेच राष्ट्र असा संकुचित विचार आज उपयुक्त नाही. महाराष्ट्रातील विचारवंत, लेखक, पत्रकार देशपातळीवर पहिल्या फळीत का दिसत नाहीत, याचा विचार व्हायला हवा. शिवाय राष्ट्रपातळीवर काम करणाऱ्या नेत्यांचीही महाराष्ट्राला अत्यंत गरज आहे. इतर राज्यांचे अर्थकारण, समाजकारण, सांस्कृतिक वारसा आणि ज्वलंत प्रश्नांवर अस्खलीत बोलू शकणाऱ्या नव्या राजकीय नेत्यांसाठी देश आणि महाराष्ट्रही भुकेला आहे.

(7) माझी शेवटची सूचना आहे ‘जागतिक मराठी थिंक टँक’ची. महाराष्ट्राने छत्रपतींच्या काळापासून संविधानाच्या जडणघडणीपर्यंत अनेक संकल्पना भारताला दिल्या आहेत. आता बदलत्या जगात बदलत्या भारतात तंत्रज्ञान आणि माध्यमांच्या सर्वव्यापी संदर्भात राज्याच्या आणि देशाच्या प्रगतीसाठी नव्या संकल्पना देऊ शकणाऱ्या ‘विचार पेढी’ची गरज आहे. ही विचार पेढी जनतेने स्वबळावर तयार करावी, शासकीय मदतीची अपेक्षा न करता.

बंधु भगिनींनो, महाराष्ट्र ही संतांची, सुधारकांची, कला- क्रीडा- साहित्य यांची भूमी आहे. कालपासून हा आनंदोत्सव पुण्यनगरीत साजरा करत आहोत. अजून दोन दिवस उत्सव चालेल. आपण सर्वजण त्याचा आनंद घ्यालच, पण यानिमित्ताने आपण एक संकल्प करू या. या महाराष्ट्रात आजकाल चाललेले आरोप-प्रत्यारोप, बाचाबाची काही अंशी शिविगाळ यातून स्वतःला मुक्त करूया. ‘भूतां परस्परे जडो मैत्र जीवाचें’ असा या भूमीचा संदेश आहे. तो प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करू या. नवा समाज नवा देश घडवू या !

# आभाळाएवढी ज्यांची उंची... स्वत:च्या वाटा शोधणाऱ्या मुसाफिरांची ओळख



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**संतांचिये पायी ह्या आध्यात्मिक लेखसंग्रहमुळे साहित्य क्षेत्रामध्ये भगवान राईतकर यांची ओळख सर्वदूर पसरलेली आहे. त्याशिवाय इंग्रजी संभाषणासाठी तसेच संगीत क्षेत्रातील कार्यासाठी मेहकरवासी त्यांना ओळखतात. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन हे त्यांचे आवडते क्षेत्र आहे. स्पर्धा परीक्षेसाठी उत्तम समुपदेशक म्हणून आणि मार्गदर्शक म्हणून ते कार्य करतात. हिवरा आश्रम येथे विवेकानंद आश्रम या संस्कारपीठात शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांच्या प्रतिभेला असलेले विविध पैलू त्यांना साखर करता येऊ लागले.**

आजच्या काळात कुणाच्या कर्तृत्वाची दखल घेणे हे कार्य करण्यासाठी मनाचा मोठेपणा हवा



असतो. अनेक लोक अनेक क्षेत्रात मोठी झाली, मोठी होत आहे मात्र कुणाचे कार्य समाजाच्यासमोर आणावे अशी उदात्त विचारसरणी फार अभावाने दिसून येते. माणसं वाचलेली भेटलेली या ग्रंथ रूपाने स्वतः उपयोग करून पाहिला, अनेकांचे कार्य लोकांच्या पुढे आणले मात्र तु असे करू नकोस, असे केल्याने तुझ्या स्वतःच्या साहित्यनिर्मिती सोबत प्रातरणा होईल असा बहुमोल सल्ला मला अनेक हितचिंतकांनी दिला मात्र मी तो जुमानला नाही कारण फक्त शब्दांना सोबती केल्यापेक्षा माणसाला सोबती केले तर मानवता धर्म वाढीस लागतो असे माझे स्वतःचे मत आहे. माझिया जातीचे मिळो मज कोणी अशा प्रसिद्ध ओळीतून आपल्या जातीचे कोणी मिळाले तर आपल्यला आनंद होतो असे म्हटले जाते, या ठिकाणी जात हा संदर्भ मी वैचारिक ह्या दृष्टीने घेतो आहे हे लक्षात घ्यावे. तर माझ्या विचाराचा कुणी एखादा मित्र आपल्या सारखे काम करतो म्हटल्यावर अंगावर मुठभर मास नक्की वाढते हे मास वाढवण्याचे काम भगवान राईतकर ह्या माझ्या जिवलग मित्राने केले आहे असे म्हणावे लागते.

"आभाळाएवढी ज्याची उंची..." ह्या उत्तुंग विचाराच्या शीर्षकासह भगवानरावांच्या पाहण्यात आणि संपर्कात आलेल्या संघर्षशील, वैचारिक पातळीने श्रेष्ठ अशा विविध व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देण्याचे काम लेखकाने या ठिकाणी केले आहे. खरे म्हणजे अध्यात्मात विशेष गती असलेले आणि हाडाचे पत्रकार असून गुरुदेव सेवा मंडळाचे सच्चे पाईक असलेले भगवानराव विविध कार्यक्षेत्रातील लोकांचा ज्या तन्मयतेने आणि आपुलकीने वेध घेतात त्यामुळे संबंधित व्यक्ती सोबत भगवानरावांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची ही ओळख प्रतिबिंबित होत असते.

बुलढाणा जिल्ह्यातील पुन्हई या छोट्याशा गावातून वैद्यकीय क्षेत्रात उंच भरारी घेणारे अभ्युदय पाइल्स लेझर हॉस्पिटल नागपूरचे प्रवीण सहावे यांच्याबद्दल माहिती देत गरजवंतांना डॉक्टर सहावे यांच्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यायचा असेल तर त्यांचा संपर्क क्रमांक टाकण्याची दक्षता याठिकाणी लेखकाने घेतलेली दिसून येते. आर्थिक परिस्थितीमुळे बाहेरगावी जाऊ न शकणारा सतीश राऊत नावाचा मुलगा पुढे भारतीय स्टेट बँकेत चीफ मॅनेजर म्हणून कार्यरत होतो आणि सहकुटुंब युरोप खंडातील साथ देश फिरून येतो अशा प्रेरणादायी कथा लेखकाने आभाळाएवढी उंची मध्ये समाविष्ट केल्या आहेत.

साधारणपणे मध्यमवर्गातील व्यक्तींच्या कार्याचा आढावा या ग्रंथामध्ये मोठ्या प्रमाणात घेतल्याचे दिसून येते. ग्राफिक कलेतून स्वतःचे जीवन असाधारण उंचीवर देणारे गजानन काटे, तर कधी गजानन पारेकर सारख्या केशकर्तन करणाऱ्या गरीब घरातील तरुणाची पुण्यामध्ये वास्तव्यास राहून मॉडेल अँड सेलिब्रिटी हेअर स्टाईलिस्ट म्हणून महाराष्ट्रभर नावलौकिक मिळवणारा तरुण, स्वतःला कुष्ठरोग झाल्यावर त्या रोगावर मात करून स्वतःचे जीवनच इतर कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी वाहून घेणारा सुरेश धोंडगे, जीवनातील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी रांगोळीच्या रंगाने स्वतःचे कुटुंब आणि जीवन विलोभनीय करणारा कृष्णा सासवडकर अशा नव्या पिढीतील आश्वासक तरुणांच्या संघर्ष कथा खरोखर नवीन प्रेरणा देतात. अनंत शेळके सारखे जिल्हा परिषद मध्ये कार्यरत असणारे तरुण शिक्षक अनाथ मुलांचे पालक जबाबदारी घेतात त्यांच्याबद्दल तुमच्या लेखकाने भरभरून लिहिले आहे. त्याच्या मागे पुढे कुणी नाही, स्वतः अनाथ असून परिस्थितीच्या भोवऱ्यात अडकून न पडता आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वतःची प्रतिमा उभी करणारे प्रदीप जाधव यांच्यासारखे, पेपर वाटण्यापासून सुरुवात वरिष्ठ उपसंपादक कार्य करणारे राजू चिमणकर अशा विविध तरुणांसोबत तोरणा अमृततुल्य असा चहा चा ब्रँड तयार करणारे उमेश चनखोरे अशी समृद्ध तरुण पिढी या पुस्तकाच्या रूपाने समाजाच्या पुढे उभी राहते. या तरुण पिढीचा संघर्ष आणि त्या संघर्षातून स्वतःला जिद्दीने आणि हिमतीने पुढे येण्याची धडपड पाहून अजून आहेत रणात लढणारे काही या सुरेश भटांच्या ओळीची आठवण येते. स्वतःच्या अस्तित्वाची आलेख उंचावण्यासाठी आजच्या काळातील महिला सुद्धा अग्रेसर आहेत या जाणिवेतून सौ अरुणा तनपुरे ह्या उद्योजक महिलांच्या कार्याचा आढावा सुद्धा घेतलेला दिसून येतो. चाफेश्वर गांगवे सारखे निवेदक आणि सचिन सावरकर सारखे पुस्तक मैत्री प्रकल्प चालविणारे लोक लेखकाने माहिती मिळवून जगापुढे आणले आहेत.

आभाळाएवढी उंची ज्यांची अशा लोकांची ओळख भगवानराव करून दिली आहे काही लेखात मात्र ही ओळख फक्त परिचयात्मक स्वरूपात आली आहे. त्यातील सूक्ष्म बारकावे आणखी उलगडता आले असते हे सांगणे आवश्यक यासाठी वाटते की त्यामुळे भविष्यात सूक्ष्म संदर्भ आणि बारकावे टिपून लेखक आपल्याला भेटतील. ओघवती भाषाशैली आणि विचाराची अथांगता व्यापक प्रमाणात लेखकाकडून ही अपेक्षा ठेवणे मला तरी रास्त वाटते. लेखकाने त्यांचे वडील विष्णुदास राईतकर यांच्यावर लिहिलेला लेख मला विशेषत्वाने आवडला. एकंदरीत हा ग्रंथ भावनिक आणि मनाचा ठाव घेणारा ठरतो त्यामागचे खरे कारण लेखकाला या व्यक्तीबद्दल निव्वळ प्रेम असणे इतके मर्यादित नसून प्रत्यक्ष संपर्कात राहिल्याने सूक्ष्म बारकावे त्यांनी टिपले आहेत हे लक्षात घेणे गरजेचे असते. या ग्रंथात असलेले अनेक लोक भगवानरावाच्या प्रमाणे माझेही निकटचे मित्र आणि स्नेही आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा मी ही जवळून अनुभवला आहे.




सामान्यातील असामान्य शोधून ते सर्व मान्य करू अशा अट्टाहासाची काही लोक समाजामध्ये आजही कार्यरत आहेत हे भगवानराव राइतकर यांनी केलेल्या या लेखनातून दिसून येते. अनेक लेखांमधून भगवान राईतकर यांचे विवेचन समाजासाठी उद्बोधक आणि प्रेरणादायी शिकवण असल्याचे आपल्याला जाणवते. जसे प्रत्येकात "व्यक्ती घडवण्यामध्ये त्याचे कुटुंब त्याचे गाव मित्रपरिवार आणि मार्गदर्शक हे महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात." यातून एका व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वा मागे त्याचा भोवताल कारणीभूत असतो, त्याचे आत्मीय लोक कारणीभूत असतात याची जाणीव करून समाजातील आपसातील हितसंबंधाचे महत्व लेखक या ठिकाणी सांगतात. त्याचप्रमाणे एका लेखामध्ये, " समाजाचा अर्थ जात धर्म पंथ व पक्ष निगडीत असलेला माणूस असे न समजता, या सर्वांचा एकत्रितपणे असलेला जनसमुदाय म्हणजे समाज होय" अशी समाजाची नवीन व्याख्या भारतीय संविधानाला पोषक आणि पूरक पद्धतीने केलेली दिसून येते. हे सर्व करत असताना, वरील पद्धतीने विचार मांडण्यासाठी लेखकाची जीवनशैली आणि विचार तितकेच असावे लागतात त्यावेळी ते शब्द भगवान राइतकर यांच्या शब्दाप्रमाणे सत्यात उतरलेले दिसून येतात. लेखकाच्या शब्दात सांगायचे तर "जीवन जगत असताना जीवनामधील कोणता क्षण कोणत्या क्षणी व्यक्तीला प्रेरणा देईल हे सांगता येत नाही" त्याचप्रमाणे वरील ग्रंथातील व्यक्ती समाजामध्ये किती लोकांना प्रेरणा देतील आणि त्यातून समाजाचे उत्थान होईल हे आपण आकडेवारीने सांगू शकत नसलो तरी अशाच ग्रंथांमधील किंवा ग्रंथांमधील व्यक्तिमत्त्वांच्या सारख्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन समाजात बोटावर मोजता येण्यासारखे जे काही सकारात्मक बीजरोपण सुरू आहे त्यामुळेच चांगुलपणाची हिरवळ खुलते आहे असे म्हणावे वाटते.

एकंदरीत लेखकाने केलेला हा प्रयत्न अतिशय स्तुत्य असून भावी पिढीसाठी प्रेरणादायक ठरणार आहे. आपलेपणाची शाबासकी ही कर्तृत्ववान माणसाला लाखमोलाची असते. लेखकाच्या तसेच या ग्रंथातील सर्व व्यक्तींना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

# बंदा रुपाया

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

किलो अशी रताळी गोड बोलून किली.....



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

जुन्या, पुराण्या, चुरगाळलेल्या नोटांच्या वासाने नकळत छाती फुलून आली, खांदे सरळ झाले.... रताळ्यांचे सहाशे रूपये मिळाले.... तडक शाळेत जाऊन सरांजवळ परिक्षा फी भरली ....दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे शाळा सुरू झाली. वर्गावर त्याच्या आवडत्या मोडक बाई मराठीचा धडा शिकवत होत्या" सत्यवचन " आवडत्या बाई, आवडता विषय असतांनाही त्याचे वर्गात बाईंच्या शिकवण्याकडे अजिबात लक्ष नव्हतं सारखी चुळबुळ चुळबुळ चाललेली होती. शेवटी बाईंनीच त्याला विचारलं काय होतंय का? असं म्हणल्याबरोबर तो उठला बाईंना एका बोटाने खुण करत त्यांना न विचारतात वर्गाबाहेर धावत सुटला.......तो तडक दामलेंच्या वाड्यात.... आण्णा ओ आण्णा! हाकांचा सपाटा लावला..... बेताची उंची, गोरेपान, कपाळावर रेखिवगंध ,कानात भिकबाळी असलेले , पांढराशुभ्र सदरा आणि धोतर नेसलेले आपलं उपरणं सावरत अण्णा समोर आले तेव्हा जगु खूप घाबरला! पण पुढच्या क्षणाला ' मी तुमच्या शेतातली रताळी चोरली, आणि ती विकली. त्याचे मला सहाशे रुपये मिळाले. मला माझ्या वडिलांनी दिलेले अडीचशे रुपये आणि रताळी विकून त्यातले उरलेले शंभर रुपये असे साडेतीनशे रुपये तुम्ही घ्या हे एका दमात वाक्य बोलला... अण्णा काहीच बोलले नाहीत, एकटक जगू कडे पाहत होते. थोडा वेळ नुसती शांतताच! आपल्या भारदस्त आवाजात त्यांनी विचारलं 'बाकीच्या पैशांचं काय केलंस? तुमच्यामुळे शाळेची फी भरल्याचं सांगितलं. रताळी विकून आलेल्या पैशात मी फी भरली...... थोडावेळ शांतता! शांतता! शांतता!

परत अण्णांनी विचारलं 'काही खाल्लेस का ? जगूने ' मानेनेच नकार दिला. त्यांनी माईंना हाक मारली "अहो ऐकलंत का ?" या मुलासाठी काहीतरी खायला घेऊन या. हे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच राधा माईंनी पांढरेशुभ्र उकडीचे मोदक त्यावर साजूक तूप घालून ताटली जगू च्या हातात टेकवली. "बाळं सावकाश खा" म्हणत त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. निमुटपणे जगूने मोदक खाल्ले. फुलपात्रातलं पाणी गटागटा प्यालं .... तृप्तीने आपसूकच ढेकर आली. अण्णांनी शंकरला हाक मारून कानात काहीतरी सांगितलं. थोड्यावेळाने शंकर पिशवीत काहीतरी घेऊन आला... अण्णांनी ती पिशवी जगुच्या हवाली केली. त्यात नव्याकोऱ्या बारा वह्या, एक कंपास पेटी इयत्ता आठवीची नवीकोरी पुस्तक बघून जगू चा आनंद डोळ्यातून अलगदच तरळला ...... कसा जाणार आहेस आता ? येताना कसा आलास ? धावत आलो असं जगूने उत्तर दिलं..... जातानां मात्र दामलेंचा पोरगा एसटीने जाणार! अण्णांनी वीस वीस रुपयांच्या दोन नोटा आणि एक बंदा रुपया जगुच्या हातात टेकवल्या. नोटा खिशात घालतांना त्या नव्या नोटांच्या वासाने परत खांदे सरळ झाले,छाती फुलून आली.बंदा रूपाया हाताच्या मुठीत घट्ट धरून जगदेवची स्वारी ! पळत पळत लालपरीच्या मागे धावली....." माझा बंदा रुपाया" नकळतच आण्णा पुटपुटले..... माई गालातल्या गालात हसत, पदर सावरीत आण्णांकडे बघत होत्या........ मनात विचार करत होत्या....बंदा रूपायाचं नाणं खणखणीत वाजणारचं!..... लालपरी ....धुळीचे लोट उडवीत दिसेनाशी झाली...



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

# अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

आधुनिक केसरी

**अखिल भारतीय साहित्य संमेलन पुढील ३,४ आणि ५ तारखेला होवू घातले आहे. या संमेलनाला देशातील बरीच मंडळी हजेरी लावणार असून त्यात विदर्भातील प्रतिभावंतांचा सिंहाचा वाटा आहे. असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्याचं कारणही तसेच आहे.**

विदर्भ म्हटलं तर साहित्यीक दृष्टीकोनातून नवरत्नाची खाण. याच भुमीत संत कालिदास होवून गेले आणि याच भुमीत स्वामी मुकूंदराज स्वामी. संत कालिदासांनी मेघदूत आणि शाकुंतल लिहिलं आणि मुकूंदराजांनी विवेकसिंधू नावाचा मराठीतील आद्य ग्रंथ. आज विवेकसिंधूचा जन्म होवून बरीच वर्ष झाली. अलिकडच्या काळाचा विचार केल्यास गझलकार स्व. सुरेश भट याच मातीतील. तसेच ज्यांनी तिफण नावाची कविता लिहिली. ते विठ्ठल वाघही याच मातीतील. तसेच शरदचंद्र मुक्तीबोध जे कवी होते, तेही याच मातीतील. एवढी विदर्भातील माती पावन आहे. यासोबतच ज्यांनी झाडीपट्टीला ख-या अर्थाने न्याय मिळवून दिला, ते डॉ. हरिश्चंद्र बोरकर याच मातीतील आहेत. त्यांनी दाखवून दिलं की विदर्भातील झाडीपट्टी हाही एक असा भाग आहे की ज्या भागातील भाषा वेगळी असून ती समृद्ध अशी भाषा आहे. त्यांना पाणी बोलता येत नाही तर ते पाण्याला पानी म्हणतात. मग पानी जरी म्हटलं तरी तो प्रमाणीत शब्द आहे. फरक जसा दगड आणि गोट्यात आहे. तोच फरक माणसात आहे. हेच दाखविणारं हे संमेलन. या संमेलनात झाडीपट्टीची बरीच मंडळी निमंत्रीतमध्ये सहभागी आहेत.

विदर्भाच्या मातीनं केवळ कवीच जन्माला घातले असे नाही तर या मातीनं कादंबरीकारही जन्माला घातले आहे. ज्यांच्या कादंबरीची ग्रीनीच बुकात नोंद व्हावी अशा शुभांगी भडभडे याच मातीतील आहेत. तसेच प्रख्यात कादंबरीकार रविंद्र शोभणेही याच ठिकाणी वास्तव्याला आहेत. याचबरोबर कथाकारांचाही जन्म याच मातीतील आहे. या संमेलनातील विशेष गोष्ट अशी की आतापर्यंत अखिल भारतीय स्तरावरील बरीच संमेलनं झाली. त्यात नवोदितांचा भरणा नसायचा. परंतू या संमेलनानं दाखवून दिलं की आम्ही नवोदितांनाही प्रवेश देवू शकतो. कारण या संमेलनाची पत्रीका पाहिली असता असं जाणवतं की ज्यांची जास्त पुस्तकं प्रसिद्ध आहेत वा लिहिली आहेत. त्यांचा या संमेलनात सहभाग दिसत नाही व ज्यांची अल्प पुस्तकं प्रसिद्ध आहेत वा एकही पुस्तक प्रसिद्ध नाही. अशी बरीच मंडळी या संमेलनात निमंत्रीत म्हणून सहभागी आहेत. वारंवार पुनरावृत्ती होणारे प्रस्थापित कवी वा लेखक दोन चार जर सोडले तर जास्त नाही. एवढा कवींचा व लेखकांचा विचार करुन आयोजनकर्त्यांनी निमंत्रीत म्हणून सहभाग केला आहे. आता विषय हा आहे की ज्यांना निमंत्रीत म्हणून संधी मिळाली, ते किती संमेलनाला न्याय मिळवून देतात की गर्वाने फुलून जातात.

याबाबतीत मी एक किस्सा सांगतो, एका कवी निमंत्रीत म्हणून अखिल भारतीय साहित्य संमेलनात कवी म्हणून सहभागी झाला होता. त्यानं एका स्पर्धेत स्पर्धेसाठी आपली रचना पाठवली. आता प्रत्त्येक स्पर्धेत प्रत्येकाची रचना क्रमांक मिळवेल असे नाही. त्याचा स्पर्धेत क्रमांक आला नाही. त्यावर तो म्हणाला,

"माझा क्रमांक स्पर्धेत का आला नाही?"

"नाही आला. ती स्पर्धा आहे. तुमच्यापेक्षा चांगल्या रचना आल्या होत्या स्पर्धेत."

"माहीत आहे का? मी अखिल भारतीय साहित्य संमेलनात प्रतिनिधित्व केलं आहे."

हे आहे अखिल भारतीय साहित्य संमेलनातील सहभागी लोकांचे हाल. आता यावरुन लक्षात येते की अखिल भारतीय साहित्य संमेलनाला सहभागी म्हणून समाविष्ट असणारी मंडळी आता यावरुन लक्षात येते की अखिल भारतीय साहित्य संमेलनाला सहभागी म्हणून समाविष्ट असणारी ही मंडळी वरील प्रकारचे बोलणं बोलण्यानं अखिल भारतीय संमेलनाचा सन्मान वाढवतात की तो सन्मान धुळीस मिळवतात हे त्यांचं त्यांनाच माहित. यावरुन विचार येतो की काही लोकांना अखिल भारतीय साहित्य संमेलनात जाण्याची संधी मिळत नाही. मग त्यांचं साहित्य हे गचाळ काय? सत्य सांगायचं झाल्यास त्यांचही साहित्य गचाळ नसतं. तसं कोणीही समजू नये. अशी बरीच मंडळी आहेत की जी अखिल भारतीय साहित्य संमेलनात सहभागी झाली नाहीत. परंतू आपल्या साहित्यानं ती मोठी झालीत.

महत्त्वाचं सांगायचं झाल्यास या अखिल भारतीय साहित्य संमेलनात सहभागी झालेल्या लोकांनी असं समजून घेवू नये की त्यांचा क्रम अखिल भारतीय साहित्य संमेलनात निमंत्रीत म्हणून लागला. तसंच उचंबळून जावू नये की आम्ही अखिल भारतीय साहित्य संमेलन गाजवलं. प्रतिनिधित्व केलं. अहो, या देशात असेही साहित्यीक आहेत की जे तुमच्यापेक्षा बरंच सरस साहित्य लिहितात. परंतू त्यांचा शोध होत नाही आणि अखिल भारतीय साहित्य संमेलन आयोजन समिती तरी कोणाकोणाला सहभागी करेल! एकशे एक सरस साहित्यीक आहेत देशात. त्यांची रीघ बरीच मोठी आहे. ही आयोजन समिती खरंच चांगली आहे की या संमेलनातून सर्वांना विचारलं गेलं. विदर्भ असो की मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र असी की खानदेश. हेच नाही तर नवोदित असो की प्रस्थापित. सर्वांना स्थान दिलं या संमेलनानं. ज्यांची वर्णी लागली त्याला आनंद झाला. ज्यांची वर्णी नाही लागली त्यांना दुःख झालं. परंतू दुःख करुन घेवू नका कोणी. कारण अखिल भारतीय साहित्य संमेलनातील आयोजन मंडळालाही मर्यादा आहेत. कोणाकोणाला ते सहभागी करुन घेतील बरे! त्यामुळे आपण स्वतः समाधानी राहिलेलं बरं!

# बुद्धिजीवी वर्गावर समाजाची प्रगती अवलंबून

## बलभीम माथेले : मौर्य क्रांती महासंघाचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कुठल्याही समाजाची प्रगती त्या समाजातील बुद्धिजीवी वर्गावर अवलंबून असते. त्यामुळे बुद्धिजीवी वर्गाने चळवळीत योगदान देवून समाजाला प्रगतीच्या दिशेने नेले पाहीजे असे प्रतिपादन मौर्य क्रांती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बलभीम माथेले यांनी केले. ते मौर्य क्रांती महासंघातर्फे वाडीभोकर रोडवरील भागाई प्राथमिक शाळेत रविवार दि. 29 जानेवारी रोजी झालेल्या एकदिवशीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हमाल मापाडी नेते आप्पा खताळ होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी पं. स. सभापती भगवान गर्दे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मौर्य क्रांती महासंघाचे प्रदेशाध्यक्ष राजीव हाके यांनी केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून माथेले यांनी शैलीदार मांडणी करीत विविध मुद्द्यांवर सविस्तर विवेचन केले, माथेले म्हणाले की, जातनिहाय जनगणनेतून समाजातील शिक्षणाचे, नोकरीचे,



व्यवसायाचे वास्तव आणि आकडेवारी समोर येईल. यातून प्रत्येक जातींची प्रगती आणि अवस्था कोणत्या टप्प्यावर आहे हे देखील स्पष्ट होईल. असे झाले तर विषमतावादी व्यवस्थेला सर्वच जातींना सर्वच बाबतीत संधी आणि न्याय द्यावाच लागेल. म्हणूनच जातनिहाय जनगणना केली जात नसल्याचा आरोपही माथेले यांनी केला. आपापले संघटनात्मक अस्तित्व कायम ठेवून एका झेंड्याखाली एकत्र आल्यास परिवर्तन निश्चितच घडवून आणता येईल. त्यामुळे एकत्र येणे गरजेचे आहे, असेही मत माथेले यांनी व्यक्त केले. संघटनेला महापुरुषांच्या विचारांची विचारधारा असली पाहीजे. विचार हे माणसाला महापुरुषांशी जोडणारे असावेत. विचार रुजला तर समाजसुधारणा होईल असेही माथेले यांनी नमूद केले.

शिवरायांचा कार्यकर्ता मावळा, महात्मा फुलेंचा कार्यकर्ता सत्यशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कार्यकर्ता अनुयायी, असाच मौर्य क्रांती महासंघाचा कार्यकर्ता मल्हार मावळा घडविणे हेच मौर्य क्रांती महासंघाचे ध्येय आहे. समाजात एक विषारी वृक्ष दिसून येतो, या वृक्षाला लागलेली फळे म्हणजे अंधश्रध्दा, फुले म्हणजे बेकारी, कळी म्हणजे हुंडाबळी, फांद्या म्हणजे भ्रष्टाचार होय. अशा प्रकारे या वृक्षात अनेक वाईट बाबी आहेत. त्यांच्या नायनाटासाठी अनेक संघटनात्मक प्रयत्न वर्षानुवर्षे सुरु आहेत. पण अपेक्षित परिणाम होत नाही. म्हणून सर्वांनी मिळून एकत्रितपणे प्रयत्न करुन या विषारी वृक्षाच्या बुंध्याशी असलेली विषारी माती उकरुन काढू. तेव्हा या वृक्षाची मुळे उघडी पडतील आणि हा विषारी वृक्ष उन्मळून पडेल. तो पुन्हा कधीही उगवणार नाही. त्यासाठी एकट्याने नव्हे तर एकीने लढूया असे आवाहनही माथेले यांनी केले. नगरसेविका वंदना भामरे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करा. महिलांनी चळवळीत प्राधान्याने आले पाहीजे. महिलांचा सहभाग हा चळवळीला मोठे बळ मिळवून देईल. महिलांनी कुठेही मागे राहू नये. समाजाला प्रगतीशील बनविण्यासाठी महिलांचीही जबाबदारी आहे की चळवळीत योगदान दिले पाहीजे, असे भामरे म्हणाल्या. कार्यक्रमात विद्रोही कवी सचिन बागुल यांनी लोककवी दीपक निकम यांची 'तांडा' ही कविता सादर केली. आप्पा खताळ यांनी कार्यक्रमाचा समारोप करताना म्हणाले की, समाजाने महापुरुषांच्या विचारांनी चालणे गरजेचे आहे. त्याकरिता अशा प्रशिक्षण शिबीरांची आज नितांत गरज आहे. यातुन जनप्रबोधन होवून नवसमाजक्रांतीची बीजे पेरली जातील. शाहीर अमर शेख यांची 'भाकर' आणि दीपक निकम यांची 'कलंकित राखी' ही कविताही खताळ यांनी सादर केली. कार्यक्रमाला शिवाजीराव पाटील, योगेश साळे, विजय पाटील, किरण मासुळे, खेमचंद पाकळे, जी के सुर्यवंशी, भरत गर्दे, ओ एम पाटील, बी एम पाटील, सुभाष मासुळे, पी झेड रणदिवे, सजन माने यांच्यासह मौर्य क्रांती महासंघाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिवलाल सोनार यांनी सेवेचा निर्माण केला आदर्श

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील दि.३१/१/२३ रोजी ऊन ,वारा, पावसाची तमा न बाळगता प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या शिवलाल सोनार यांनी डाक सेवेचा एक आदर्श निर्माण केला, असे गौरवोद्गार भुसावळ विभागाचे डाक निरीक्षक दिगंबर चौधरी यांनी काढले. पहुर येथील पोस्टमन शिवलाल तुकाराम सोनार यांच्या सेवापुर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

निवृत्त पोस्टमास्तर एकनाथ गवई, निवृत्त रेल्वेपोस्ट अधिकारी देविदास सोनार, शालिक बाविस्कर, किशोर सोनार, शंकर भामेरे आदींनी शिवलाल सोनार यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा सत्कार केला. टपाल विभागाच्या वतीने दिगंबर चौधरी आणि सब पोस्ट मास्तर श्रीनिवास मेहरुनकर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र, स्नेहवस्त्र, पुष्पगुच्छ , श्रीफळ देऊन त्यांना सपत्नीक सन्मानित करण्यात आले.

अतिशय प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतून शिवलाल सोनार यांनी आपले शिक्षण पूर्ण करून १९८० मध्ये ते टपाल विभागात रुजू झाले. पहूर, शेंदुर्णी, भुसावळ अशा विविध ठिकाणी त्यांनी सेवा बजविली. सुमारे ४२ वर्षांची प्रदीर्घ सेवा त्यांनी करून आज ( ता . ३१ ) ते निवृत्त झाले. सत्काराला उत्तर देताना त्यांना भावना टाटून आल्या . यावेळी सारेच वातावरण भावूक झाले होते. सायकल वरून टपाल वाटत येणारे पोस्टमन काका आता येणार नसल्याने टपाल विभागातील कर्मचाऱ्यांचा सुद्धा कंठ दाटून आला होता.

या प्रसंगी दिलीप भालेराव, पंढरी ठाकूर, सुभाष सोनार, गजानन सोनार, भरत पाटील, निलेश सोनार यांच्यासह आप्तेष्ट, माता - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी दिपाली गायकवाड , अमोल लोखंडे, गिरीश जाधव, भूषण बोरसे आदींनी सहकार्य केले. श्रीनिवास मेहरुनकर यांनी सूत्रसंचालन केले. किशोर सोनार यांनी आभार मानले.

# अमित राज ठाकरे २ फेब्रुवारी रोजी सोलापुरात

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित राज ठाकरे हे विद्यार्थी महासंपर्क अभियान अंतर्गत 2 फेब्रुवारी रोजी रात्री पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे मुक्कामी येणार असून 3 फेब्रुवारी सकाळी 9 वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी चे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर मंगळवेढा येथील मनसेच्या कार्यालयाचे उद्घाटन सकाळी 10 वाजता त्यांचे हस्ते करण्यात येणार आहे. मंगळवेढा येथून सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे सकाळी 11वाजता येणार आहेत . सकाळी 11 ते 2 ते प्रत्येक तालुक्यातील विद्यार्थ्यांशी सवांद साधणार आहेत.त्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील सर्व मनसे पदाधिकारी यांची बैठक घेणार आहोत. त्यानंतर श्री सिद्धरामेश्वर चे दर्शन घेऊन सोलापूर शहरातील दयानंद महाविद्यालय येथे मनसे विद्यार्थी सेनेच्या शाखेचे उद्घाटन करण्यात येणार. सायंकाळी 5 वाजता मोडनिंब येथे शाखेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. हा दौरा विद्यार्थी केंद्र बिंदू ठेऊन करण्यात येणार आहे. ते सर्व विद्यार्थ्यांशी सवांद साधणार आहेत.

यावेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, जिल्हा अध्यक्ष विनायक महिंद्रकर,प्रशांत गिड्डे, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहर अध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष अमर कुलकर्णी इत्यादी उपस्थित राहणार आहेत.

# ज्ञानाच्या जोरावर भारत विश्वगुरु : केतकर

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** महाशक्ती आणि विश्वगुरु या दोन संकल्पनांमध्ये फरक असून आपल्या ज्ञानाच्या जोरावर भारत विश्वगुरु होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि ऑर्गनायझर साप्ताहिकाचे संपादक प्रफुल्ल केतकर यांनी रविवारी केले.

प्रबोधन मंच, पुणे या संस्थेच्या वतीने 'भारत' या संकल्पनेपुढील सद्यकालीन आव्हाने' श्री. केतकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ मिरासदार तसेच कार्यवाह किशोर शशितल हे उपस्थित होते.

या वेळी प्रफुल्ल केतकर म्हणाले, की सोव्हिएत रशियाच्या पतनानंतर जगामध्ये फार मोठी उलथापालथ झाली आहे. आता डाटा हा नवीन तेल (किमती वस्तू) झाला आहेत. याचे पडसाद भारतामध्येही जाणवायला लागले आहेत. यातूनच वेगवेगळ्या पद्धतीचे टूल किट व आंदोलन सुरू झाले. त्या माध्यमातून भारतीय समाजमनामध्ये संभ्रम निर्माण करणारे विमर्श तयार झाले आहेत. जागतिक परिस्थितीचा आढावा घेत ते म्हणाले, की सध्या युरोपियन सभ्यतेसमोर इस्लामी कट्टरवादाचे आव्हान आहे. शिवाय किती दिवस युरोप अमेरिकेचे शेपूट म्हणून राहणार, हा प्रश्नही त्यांना भेडसावतो आहे. यूरोपची स्थिती वाईट आहे. दुसरीकडे अमेरिका तांत्रिकदृष्ट्या प्रगत असली तरी तिथे सांस्कृतिक आणि सामाजिक समस्या आहेत. युरोपमध्ये धार्मिक हिंसा सुरू असून आतापर्यंत शांततापूर्ण असलेले स्वीडनही अशांत होऊ पहात आहे. भारतीय राष्ट्रीयत्वाचा विचार मांडताना ते म्हणाले की वेगवेगळी राज्यव्यवस्था आणि उपासना असूनही एक पुण्यभूमी म्हणून भारत नांदू शकतो, हे सनातन परंपरेतून दिसते. त्यामुळेच इतके आक्रमण होऊनही आपल्या मूळ विचारांवर हा सनातन भारत जीवंत आहे. भारत ही उतरणीला लागलेली सभ्यता नसून ती उगवती सभ्यता आहे. भारतात आध्यात्मिक लोकशाही आहे. हा देश विविधतेचा उत्सव साजरा करतो आणि जगामध्ये हे चित्र फक्त भारतातच दिसेल. भारताचे हेच वैशिष्ट्य अन्य राष्ट्रांसाठी समस्या ठरले आहे. भारतात विविधतेला विसंगती न मानता राष्ट्रीयत्वाची कल्पना असून तीच भारताची कल्पना आहे. महाशक्ती आणि विश्वगुरु मध्ये असलेला फरक व्यक्त करताना ते म्हणाले, की कोरोनाच्या काळात लसींचा आपण व्यापार न करता विश्वबंधुत्वाच्या भावनेतून लसींचा पुरवठा केला. हाच हिंदू दृष्टिकोनातून केलेला विचार आहे. आज राष्ट्रसंघाने योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव पारित केला आहे तर भारत हा आंतरराष्ट्रीय सौरशक्ती केंद्र होऊ पाहत आहे. जगातील संकटांवर उत्तर शोधण्याची शक्ती भारताकडे आहे. एकीकडे हा देश आध्यात्मिक केंद्र असूनही स्टार्ट-अपमध्ये प्रगतीशील आहे. जगाच्या कल्याणासाठी आणि मानवी कल्याणासाठी भारताची कल्पना (आयडिया ऑफ इंडिया) जागतिक पातळीवर व्यवहारामधून दाखवावी लागेल. सुदैवाने तशी राजकीय इच्छाशक्ती आपल्याकडे सध्या आहे. या वैचारिक आंदोलनामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे.

# सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्ग २०२५ पर्यंत पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी साहेबांनी सोलापूर-तुळजापूर-धाराशिव (उस्मानाबाद) रेल्वे मार्गाबाबत जिल्ह्यातील जनतेला दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी केंद्र, राज्य सरकारकडून गतीने प्रयत्न चालू असून ८४.४४ किमी लांबीच्या मार्गासाठी राज्य शासनाने आपल्या वाट्याचे ४५२ कोटी ४६ लाख रुपये आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय घेतल्याने व केंद्राकडून देखील निधी मिळणार असल्याने निधीची अडचण भासणार नाही. त्यामुळे राज्य शासनाने हा प्रकल्प फास्ट ट्रॅकवर घेत आपल्या ‘महारेल’ च्या माध्यमातुन २ वर्षात पूर्णत्वास नेण्याचे नियोजित आहे.

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांची गतीने अंमलबजावणी करण्यासाठी उपुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारने २०१७ साली महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ‘महारेल’ ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता. या ‘महारेल’ च्या माध्यमातून राज्यात अनेक रेल्वे प्रकल्पांचे काम दर्जेदार व गतिमान पद्धतीने पूर्ण केले आहे.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव (उस्मानाबाद) रेल्वे मार्गाबाबत उपमुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेबांचे विशेष लक्ष असून त्यांच्या



मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. त्यासाठी राज्य सरकारने सदर रेल्वे मार्ग ‘महारेल’ या स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) च्या मार्फत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने ‘महारेल’ कडे प्रकल्पाचे हस्तांतरण करण्यासाठी प्रधान सचिव परिवहन यांच्या स्तरावरून रेल्वे बोर्डाची प्रशासकीय मान्यता घेण्याची प्रक्रीया सुरू आहे.

रेल्वेचे अधिकाऱ्यांनी सोलापूर-तुळजापूर-धाराशिव (उस्मानाबाद) रेल्वे मार्ग पूर्ण करण्यासाठी अंदाजे ४ वर्षाचा कार्यकाल अपेक्षित असल्याचे सांगितले होते. मात्र राज्य सरकारने सदर प्रकल्प फास्ट ट्रॅकवर घेत लवकरात लवकर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून याबाबतच्या प्रशासकीय मान्यता लवकरच मिळेल व हा प्रकल्प २०२५ पर्यंत पुर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

तत्कालीन ठाकरे सरकारने जर यापूर्वीच राज्याचा वाटा उचलण्यासाठी प्रयत्न केले असते व निर्णय घेतला असता तर कदाचित हा प्रकल्प आतापर्यंत पूर्ण झाला असता ही खंत भाजप आमदार राणा पाटील यांच्याकडून बोलली जात आहे. मात्र आता राज्यात शिंदे-फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गतिमान सरकार आल्याने याबाबत सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता तातडीने होत असून जिल्ह्यातील जनतेला पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी साहेबांनी तुळजापूरला रेल्वेच्या नकाशावर आणण्याचा दिलेला शब्द २०२५ पर्यंत पूर्णत्वाला जाईल याबाबत खात्री आहे.

# धुळ्यातील विद्यावर्धिनीत मराठी भाषा पंधरवडा संपन्न

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला

आधुनिक केसरी न्यूज



धुळे :-जिल्हा मराठी भाषा समिती व शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय धुळे मार्फत 14 ते 24 जानेवारी अखेर मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांच्या सांगता सोहळा विद्यावर्धिनी कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला यावेळी वरिष्ठ अधिकारी व सर्व शिक्षक उपस्थित होते. शिक्षण अधिकारी यांच्या हस्ते शॉल टोपी व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. व जिल्हाधिकारी जलद शर्मा यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. जलद शर्मा यांनी मराठी ग्रंथ पुस्तकाचे पूजन करून वंदन करण्यात आले व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

काही वेळात विद्यार्थिनींनी सुंदर मराठी गीत गाऊन सर्वांचे मन भरून गेले. या ठिकाणी जिल्हाधिकारी जलद शर्मा म्हणाले की प्रत्येक भाषांचे अनेक महत्त्व असते जे मूकबधिर लोक बोलू शकत नाही त्यांची सुद्धा एक वेगळ्या प्रकारची भाषा असते. माझं मुळगाव हरियाणा आहे व मला महाराष्ट्रात काम करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे माझी जन्मभूमी जरी हरियाणा परंतु माझी कर्मभूमी ही महाराष्ट्र आहे व माझी महाराष्ट्राला संपूर्ण जीवन अर्पण करण्याची तयारी आहे. माझ्यासमोर मराठी भाषा शिकण्याचे मोठे आव्हान होते. ते नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी मराठीत बोलू शकतो व माझे कार्य पार पाडत असतो. मी असे आवाहन करतो की सर्व विद्यार्थी त्यांच्या जीवनात काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करतील. मराठी भाषा ही जरी आपली मातृभाषा आहे परंतु या युगात एक भाषावर अवलंबून राहू नका कारण आपल्या जीवनाची गाडी कुठेही जाऊ शकते त्यामुळे फॉरेनची भाषा व सर्व भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी जलद शर्मा यांनी सांगितले.

या कार्यक्रमात शिक्षण अधिकारी यांनी मराठी भाषेचे महत्व कळवून दिले. शिक्षण अधिकारी यांनी सांगितले की आपल्या महाराष्ट्रात परप्रांतीय अधिकारी मराठी भाषेला आपलेसे करून स्वीकारतात व बोलायला लागतात जसे की आपल्या धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी परप्रांती असून धुळ्यात येऊन त्यांची मराठी भाषेची खूप आवड झाली. परंतु आपण इतर परप्रांतात जातो आपणच त्यांच्यासोबत आपली मराठी भाषा सोडून त्यांची भाषा बोलायला लागतो ते विक्रेता त्यांची भाषा सोडत नाही आपण का सोडावी..? आपल्या भाषेचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. आपल्या संस्कृतीचा अभिमान असला पाहिजे हे जोपासण्यासाठी पंधरवड्यात भरपूर कार्यक्रम घेण्यात आले संतांनी आपल्यासमोर भरपूर वांग्मय लिहिले आहेत विकिपीडिया मध्ये कित्येक आर्टिकल टायपिंग देखील मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणे उपयोग केला जात आहे एवढा मोठा ज्ञानाचा साठा असून देखील आपल्याला असे वाटते की मराठी भाषेमध्ये ज्ञान कमी आहे परंतु आपल्यातच याचा अभ्यास कमी असल्यामुळे असे वाटते त्यामुळे येणाऱ्या 27 फेब्रुवारीला मराठी भाषा दिन आहे एक मोठा कार्यक्रम जिल्हा मराठी भाषा समितीतर्फे करणार आहोत त्या ठिकाणीही मराठी भाषेचे महत्त्व कळवले जाईल असे शिक्षण अधिकारी यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या उपस्थितीत धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जलद शर्मा, शिक्षण अधिकारी व सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# विधवा महिलेची काळे फासत चपलाहार घालून धिंड

## चांदवड : राज्य सरकारने दखल घेतल्याने टाळाटाळ करणाऱ्या पोलिसांकडून अखेर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** पतीच्या निधनास जबाबदार धरत विधवा महिलेची तोंडाला काळे फासत, गळयात चपला घालून धिंड काढल्याप्रकरणी राज्य सरकारने दखल घेतल्याने सासरच्या मंडळींवर अखेर वडनेरभैरव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शिवरे, ता.चांदवड येथील पतीच्या निधनानंतर विधवा महिलेच्या तोंडाला काळे फासत, गळ्यात चपलाहार घालून गावात धिंड काढल्याचा व्हिडिओ काल संध्याकाळी समाज माध्यमांत व्हायरल झाल्याने घटनेला वाच्यता फुटली व पुरोगामी महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. आपल्या पतीचा मृत्यू नैसर्गिक नसून घातपात असल्याचा आरोप करीत पीडित महिलेने वडनेर भैरव पोलीस ठाणे गाठले मात्र पोलिसांनी तिची तक्रार दाखल करून घेण्यास नकार दिला. मात्र काल उशिरा राज्य शासनाने दोषींवर कठोर कारवाईचे आदेश जिल्हा पोलिसांना दिले. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दखल घेतली त्यानंतर पाच ते सहा नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पीडित महिलेचा किरकोळ अपघात होऊन तिचा हात फ्रॅक्चर झाला होता. तिच्या हाताला प्लास्टर करण्यात आले होते.



तब्येतीत सुधारणा व्हावी यासाठी तिच्या पतीने तिला माहेरी पोहोचवलं. पत्नी माहेरी असताना पती दोन मुलींसह एक-दोनदा भेटायलाही येऊन गेला.

दरम्यान पत्नी माहेरी असतानाच पतीचे दहा दिवसांपूर्वी निधन झाले. यावेळी पत्नी दशक्रिया विधीच्या वेळी आली असताना गावातील स्थानिक नागरिकांनी मारहाण केल्याचा आरोप या महिलेने केला आहे. याबाबत व्हिडीओ समोर आला असून यात तिच्या तोंडावर काळे फासण्यात आले असून गळ्यात चपलांचा हार असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हा निंदनीय प्रकार म्हणावा लागेल, मात्र अद्याप या प्रकरणातील नेमके कारण समोर आले नाही.

# पीरबावडा येथे नागनाथ बँकेच्या वतीने हळदी - कुंकू

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील पीरबावडा येथील नागनाथ अर्बन क्रेडिट सोसायटीच्या पिरबावडा शाखेतर्फे महिलांसाठी हळदी - कुंकू कार्यक्रम पार पडला. नागनाथ अर्बनची पिरबावडा येथे शाखा असून या बँकेचे मोठया प्रमाणावर खातेदार आहेत यात काही गरजवंत खातेदारांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे संक्रातीनिमित्त हळदी कुंकू कार्यक्रम घेण्यात आला यावेळी जवळपास सहाशे महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी येथील सरपंच डॉ. सारंग गाडेकर, नागनाथ अर्बनचे चेअरमन रत्नाकर म्हस्के, प्रफुल्ल शिंदे, निवृत्ती काळे, व्यवस्थापक लक्ष्मण डकले, काकासाहेब फसाटे, राजू चोपडे, सुनील फसाटे, कृष्णा कोंडके, शुभम म्हस्के, सुनिल बहादूरे यांच्यासह कर्मचारी व महिला उपस्थित होत्या.



# 'आम्ही ओंजळकर' डोंबिवलीत रंगले साहित्य स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज



**नवी मुंबई :** रविवार दि.२९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळात 'ओंजळीतील शब्दफुले समूह' आयोजित 'आम्ही ओंजळकर...' हे साहित्य स्नेहसंमेलन डोंबिवली येथे दिमाखदार संपन्न झाले. संमेलनाचे उद्घाटकः डॉ.विजय जोशी (ऑस्ट्रेलिया) संमेलनाध्यक्ष : ज्येष्ठ साहित्यिक मा. विजय फडणीस प्रमुख पाहुणे : ज्येष्ठ गझलकार मा.श्री.प्रशांत वैद्य या मान्यवरांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद या संमेलनाला लाभले. या सर्वांचे विचार, मार्गदर्शन, रचना यांचा उपस्थित ओंजळकरांनी मनभरून आनंद घेतला. काव्यरत्नांची ओळख, साहित्यिक प्रश्नमंजुषा, उपस्थितांचे काव्यसंमेलन, आणि मांन्यवरांचे विचार असा कार्यक्रम संपन्न झाला. 'आम्ही ओंजळकर...' स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी समूह प्रशासक विचैमा विजय जोशी, चैत्राली जोगळेकर आणि मानसी चापेकर) यांनी विशेष मेहनत घेतली... अशी माहिती समूह प्रशासक विजय जोशी, डोंबिवली यांनी दिली.



# दुहेरी रेल्वे लाईनसह; प्रलंबित प्रश्न सोडवा : गणेशराव पा. करखेलीकर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पूण्यतिथीचे औचित्य साधत मराठवाड्यातील रेल्वेच्या प्रलंबित मागण्या संदर्भात रेल्वे मंत्र्याचे लक्ष वेधण्यासाठी सविनय सनदशीर मार्गाने आंदोलन करण्यात आले. मराठवाड्याच्या विकासात दळण वळणाच्या साधनांची विशेषतः रेल्वेची भूमिका मोलाची आहे. मात्र रेल्वे मंत्रालयाकडून मराठवाड्यावर नेहमी अन्यायच होत आहे. त्यामुळे अनेक प्रश्न प्रलंबित राहिले आहेत.

मराठवाड्यातील दुहेरी रेल्वे लाईन त्वरित पूर्ण करा, धर्माबाद रेल्वे स्टेशनवर सर्व गाडयांना थांबा द्या, तालुक्यातील उड्डाणपूल व भुयारी मार्गाचे काम पूर्ण करा, दक्षिण मध्य विभाग सेंट्रल झोनला जोडा, रोटेगाव - कोपरगाव रेल्वे सुरु करा तत्सम मागण्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून रेल्वे मंत्र्यांना देण्यात आले.

या निवेदनावर गणेशराव पा. करखेलीकर , मराठवाडा जनता विकास परिषदेचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष नागोराव रोषणगावकर, उत्तमराव पा. बाचेगावकर, सचिव जी.पी. मिसाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राम पा.बन्नाळीकर, ताहेर पठाण, शिवराज पा. चोळाखेकर, संदीप पा. जवळेकर, चक्रेश पाटील, पत्रकार बाबूराव गोणारकर आदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अपर्णा मेहता यांना 'नारी शक्ती' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात नाशिकच्या तेजस फाउंडेशन तर्फे अपर्णा मेहता यांना नारी शक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार जेष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ ऋषिकेश कांबळे, संस्थेच्या संस्थापक, अध्यक्षा मेघा डोळस, महेंद्र तुपे, स. सो. खंडळकर, मधुकर वैद्य, हसन इनामदार व इतर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. तेजस फाउंडेशन ही नाशिकची संस्था असून सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल ही संस्था दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देत असते. या संस्थेच्या संस्थापक व अध्यक्षा मेघा डोळस आहेत. अपर्णा मेहता या होल्डिंग हँड्स या संस्थेच्या सचिव असून ही संस्था देश पातळीवर काम करते. अपर्णा मेहता आपले सामाजिक काम फक्त महाराष्ट्रापुरत्या मर्यादित न ठेवता पंजाब मध्ये ही त्यांनी उल्लेखनीय काम केलेलं आहे. या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी होल्डिंग हँड्सचे संस्थापक, अध्यक्ष सुरेश सिरसीकर, वर्षा जैन, रवींद्र बनकर इत्यादी उपस्थित होते.



# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे जळगावात आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन 2 ते 5 फेब्रुवारी 2023 दरम्यान जळगाव येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत महावितरणच्या सर्व 16 परिमंडलांतील 1 हजार 83 अभियंते, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होणार आहेत. यात 353 महिला तर 730 पुरुष खेळाडूंचा समावेश आहे.

महावितरणमधील कर्मचाऱ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. 2022-23 या वर्षाकरिता या स्पर्धेचे यजमानपद जळगाव परिमंडलाकडे आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन गुरुवारी (2 फेब्रुवारी) सकाळी साडेनऊ वाजता जळगाव येथील एकलव्य क्रीडा संकुलात महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, संचालक (संचालन) संजय ताकसांडे, संचालक (वित्त) रवींद्र सावंत, संचालक (प्रकल्प/मानव संसाधन) प्रसाद रेशमे, प्र. संचालक (वाणिज्य) तथा कार्यकारी संचालक (देयके व महसूल) योगेश गडकरी, कार्यकारी संचालक (संचालन/मानव संसाधन) अरविंद भादीकर, कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) प्रमोद शेवाळे, कार्यकारी संचालक (वित्त व लेखा) स्वाती व्यवहारे, प्रादेशिक संचालक (नागपूर) सुहास रंगारी, प्रादेशिक संचालक (पुणे) अंकुश नाळे उपस्थित राहणार आहेत.




या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण रविवारी (5 फेब्रुवारी) दुपारी 4 वाजता एकलव्य क्रीडा संकुलावरच कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक (संचालन) संजय ताकसांडे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, संचालक (वित्त) रवींद्र सावंत, संचालक (प्रकल्प/मानव संसाधन) प्रसाद रेशमे, प्र. संचालक (वाणिज्य) तथा कार्यकारी संचालक (देयके व महसूल) योगेश गडकरी, कार्यकारी संचालक (संचालन/मानव संसाधन) अरविंद भादीकर, कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) प्रमोद शेवाळे, कार्यकारी संचालक (वित्त व लेखा) स्वाती व्यवहारे, प्रादेशिक संचालक (नागपूर) सुहास रंगारी, प्रादेशिक संचालक (पुणे) अंकुश नाळे, स्पर्धेचे मुख्य समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेत खो-खो, ॲथलेटिक्स, क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, टेनिक्वाईट, कॅरम, कबड्डी, व्हॉलीबॉल, कुस्ती, बुद्धिबळ आणि ब्रिज या खेळांचा समावेश आहे. वैयक्तिक, सांघिक आणि सर्वसाधारण या तिन्ही प्रकारात विजेत्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत.
जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता कैलास हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली विविध समित्यांचे गठण करण्यात आले असून स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, अधिकारी, कर्मचारी आणि आयोजन समितीचे सचिव तथा जळगाव परिमंडलाचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर परिश्रम घेत आहेत.

## पांडुरंग घोटकर यांना संगीत अकादमी पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध जेष्ठ ढोलकीवादक



पांडुरंग घोटकर यांना केंद्र शासनाचा संगीत अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. 23 फेब्रुवारी 2023 रोजी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती त्यांचे चिरंजीव प्रसिद्ध ढोलकीवादक कृष्णा मुसळे यांनी दिली. लोकसंगीत व ढोलकीवादनाच्या साधनेसाठी आणि त्यातील अमूल्य योगदानासाठी संगीत नाटक अकादमीच्या वतीने 2019 साठी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. **13 देशात जागतिक लोककलेत सहभाग :** प्रसिद्ध ढोलकीवादक पांडुरंग घोटकर यांनी जपान, चीन अशा जवळपास 13 देशात जागतिक लोककला महोत्सवात संबळ व ढोलकी वाजवून भारताचे प्रतिनिधित्व केले. 50 वर्षात त्यांनी मराठी, हिंदी चित्रपट सृष्टीत संगीतकारासोबत वादन केले.

## मारहाणीच्या खोट्या गुन्ह्यात आरोपी तीन वर्षांनंतर निर्दोष

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गौताळा परिसरातील पुरणवाडी चेक पोस्ट वरून जाताना पर हेड शंभर रुपये एंट्रीफीस घेणाऱ्या वनविभागातील सुरक्षा रक्षकाला मारहाण केल्या प्रकरणी आरोपींना सबळ पुराव्या अभावी अतिरिक्त सत्र न्यायाधीश वी. आर. जगदाळे यांनी निर्दोष मुक्त केले. संतोष बाजीराव सोळुंके (४७) व प्रकाश रामभाऊ गाडेकर (४८) दोघेही रा. चिमणापूर असे निर्दोष सोडलेल्या आरोपींची नावे आहेत. तीन वर्षांपूर्वी २०१८ साली वरील आरोपीनी गौताळा वनविभागाचे सुरक्षा रक्षक ए. आर. शेख हे गस्तीवर असताना त्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा गुन्हा कन्नड पोलीस ठाण्यात दाखल आहे. या संदर्भात आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपीचे वकील ॲड . प्रशांत नागरगोजे , ॲड. विष्णू नरके व ॲड. व्ही. बी. मालानी यांनी युक्तिवाद करताना वनविभागातील कर्मचाऱ्याने खोटा गुन्हा दाखल केल्याचे नमूद केले. गौताळा अभयारण्याच्या बाजूला पुरणवाडी नावाचे गावठाण आहे. गौताळा अभयारण्यातूनच गावकऱ्यांना कन्नड शहरात यावे-जावे लागते. दुसरा मार्ग नाही म्हणून वनविभागाच्या चेक पोस्टवरूनच या गावी जाता येते. नियमानुसार हे योग्य नव्हते. फिर्यादी ए. आर. शेख हे चेक पोस्टवरुन ये- जा करणाऱ्या नागरिकांकडून परहेड १०० रु. वसुली करत होते. या प्रकरणी आरोपींनी वनविभागाच्या कर्मचाऱ्याला कडक जवाब मागितला. त्यामुळे चिडलेल्या फिर्यादीने सरळ पोलीस ठाण्यात खोटा गुन्हा दाखल केल्याचे आरोपीच्या वकिलांनी युक्तिवादातून न्यायालयापुढे मांडले. या प्रकरणात एकूण ८ साक्षीदारांनी आपले जबाब नोंदवले आहेत. न्यायालयाने फिर्यादी ए. आर. शेख यांच्या वकिलांनी मांडलेले मुद्दे खोडून काढले. तसेच आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली सरकार तर्फे या प्रकरणात ॲड. एन. एन. पवार यांनी काम पाहिले.

## लग्नाचे अमिष दाखवून शोषण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लग्नाचे आमिष दाखवत मे २०२१ पासून प्रेयसीचे शोषण करणाऱ्या इसमाला सिडको पोलिसांनी बेड्या ठोकल्या. सागर शेखनाथ जाधव (३०)रा. वानखेडेनगर असे अटक आरोपीचे नाव आहे. काही महिन्यापूर्वीच पीडितेने आरोपीला धाक दाखवण्यासाठी त्याच्या विरोधात विनयभानगाचा गुन्हा दाखल केला होता. कारण आरोपीने शोषणाचे व्हिडीओ तयार केले होते, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. तो गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपीने पिडीत प्रेयसीला मारहाण केली होती. त्यानंतर ३१ जानेवारी रोजी पहाटे १ वा पीडितेच्या फिर्यादीवरून बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे.

आरोपीने पीडितेला शहरातील विविध ठिकाणी नेट गेल्या दोन वर्ष शोषण केले लग्नाचे नाव काढले की, आरोपी पीडितेला टाळत होता या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कृष्णा घायाळ करत आहेत

## पुणे-सोलापूर मार्गावर बसची ट्रकला धडक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सोलापूरहून पुण्याकडे येणाऱ्या भरधाव प्रवासी बसने थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात चार जण जागीच ठार झाले असून, १५ जण जखमी झाले आहेत. हा अपघात सोलापूर-पुणे महामार्गावर यवत जवळील माणगाव सीएनजी पंपासमोर पहाटे सव्वापाच वाजता घडला. मृतांमध्ये एका पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.
पोलीस कर्मचारी नितीन दिलीप शिंदे (वय ३६) अमर मानतेश कलशेट्टी (वय २०), गणपत मलप्पा पाटील (वय ५५), आरती बिराजदार (वय २५) अशी मृत्यू पावलेल्यांची नावे आहेत. अपघातात १५ जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

# अन्नत्याग आंदोलननिमित्ताने १९ मार्च रोजी पत्रकार वसंत मुंडे यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** १९ मार्च या दिवशी किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने जगभरातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्याप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करण्यात येते. यावर्षी अन्नत्याग आंदोलना सोबतच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

अंबाजोगाई येथे गेली सात वर्षांपासून १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासर्व कार्यक्रमात या विभागातील शेतकरी आणि त्यांची मुलं मोठ्या हिरीरीने सहभाग घेत असतात. यात महिलांची संख्या विलक्षणीय असते हे महत्त्वाचे आहे. यावर्षी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने दिवसभर अन्नत्याग आंदोलनात सहभागी झालेल्या किसान आणि किसान पुत्रांना सामुहिक उपवास सांगता समारंभाचे आयोजन करण्यात आले असून याला जोडुनच शेतकरी प्रश्नांचे आणि शेतकरी आत्महत्यांचे अभ्यासक व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किसान पुत्र वसंत मुंडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.



अंबाजोगाई नगर परिषदेच्या गार्डन मध्ये हा कार्यक्रम १९ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलनात सहभागी होणा-या सर्व किसान पुत्रांना एकत्रित येऊन उपवासाची सांगता करता यावी यासाठी या सांगता समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने नगर परिषदेच्या गार्डन मध्ये सायंकाळी चार वाजता पत्रकार वसंत मुंडे यांचे व्याख्यान होईल आणि त्या लगोलग सांगता समारोह होईल. या समारोहात उपवास सोडण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमास अंबाजोगाई शहर आणि परिसरातील किसान पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब, स्थानिक संयोजक सुदर्शन रापतवार, वैजनाथ शेंगुळे, अनिरुध्द चौसाळकर, बालासाहेब केंद्रे, वसंत मोरे (माजी सरपंच मोरेवाडी), दत्ता वालेकर, जगदीश जाजू, प्रा. शैलजा बरुरे, ज्योती शिंदे, ॲड. संतोष पवार, सुभाष बाहेती, चंद्रशेखर वडमारे, शेख जमील, रोटरी क्लब अंबाजोगाई, ज्येष्ठ नागरिक संघटना, मानवलोक व इतर संघटनांनी केले आहे.



## गोदावरी प्रगट दिनाला हजारो दिव्यांनी पैठणमध्ये उजळला गोदाघाट

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** गोदावरी प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संत एकनाथ महाराज समाधी मंदिरा पाठीमागे हजारो दिव्यांनी उजळला गोदाकाठ. राजमुद्रा प्रतिष्ठानच्या अध्यक्ष तुषार पाटील तसेच ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पंधरा वर्षांपासून गोदावरीचे पुजन करुन गोदाकाठावर हजारों दिवे लावून साजरा केला जातो गोदावरी प्रगट दिन. या निमित्ताने समाज कार्य करणाऱ्याचा दरवर्षी गोदा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदाचा गोदावर पुरस्कार प्रवाह अनाथालय टाकळी येथील संचालक रामेश्वर गोर्ड यांना देण्यात आला. यावेळी अध्यक्ष तुषार पाटील, नाथ संस्थानचे कार्यकारी विस्वस्त बाजीराव बारे, भागवताचार्य शिवाजी महाराज शेलूकर, पोलीस निरीक्षक किशोर पवार, माजी नगरसेवक नाथशेठ पोरवाल, कांताबापू काळे, शिवसेना महिला अघाडीच्या ज्योती काकडे, अमोल जाधव, माजी नगरसेवक सोमनाथ परळकर, शहादेव लोहारे, सरपंच निवृत्ती मापारी, ईश्वर दगडे, अस्लम पठाण, दत्ता निवारे, अजय परळकर, विजय लोहिया, समिर शुक्ला, मंगेश कुलकर्णी सह भाविकांची उपस्थिती होती.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# महसुलच्या खडीक्रशर दगडखाणपट्टा कारवाई नाट्याचे पितळ उघडे

## सील करण्याचे रंगवले नाट्य : रात्री स्फोटकाद्वारे उत्खननासह खडीक्रशरही चालतात बेकायदेशीर

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** पूर्णा तालुक्यात मागील अनेक वर्षापासून जिल्हा प्रशासनाच्या दफ्तरी कायम बंदसह परवान नुतनीकरणाची केवळ नोंद ठेवून प्रत्यक्षात मात्र नियमितपणे प्रचंड प्रमाणात बेकायदेशीर स्फोटकांद्वारे उत्खनन व खडी निर्मितीचा कारोभार महसुल प्रशासन व तहसीलदार यांच्या संगणमतातून शासनाला रॉयल्टीच्या स्वरुपात प्राप्त होणारा लाखों रुपयांचा महसूल बुडवून चालत असल्याचा गंभीर प्रकार प्रसार माध्यमांनी उघडकीस आणल्यानंतरस्थानिक तहसीलदार टेमकर व महसुल प्रशासनातील गौण खनिज माफीयांची आर्थिक हितसंबंध जोपासत पाठराखण करणाऱ्या भ्रष्ट अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी मागील वर्षी १६ डिसेंबर २०२२ रोजी पूर्णा तालुक्यातील तब्बल १४ खडीक्रशर व दगडखाणपट्टे सील करण्याचे नाट्य रंगवून दि.१९ डिसेंबर २०२२ जिल्हा खनिकर्म अधिकारी परभणी यांना गौण खनिजाच्या अनाधिकृत उत्खननासह दगडखाणपट्टे/ दगडगिट्टी मोजनी करीता ड्रोन उपलब्ध करुन देण्याची लेखी पत्र क्र.जा.क्र.२२२/ गौण खनिज/कावी या पत्राद्वारे मागणी केली परंतु प्रत्यक्षात मात्र कोणत्याही प्रकारची कारवाई न करता संबंधित खडीक्रशर व दगडखानपट्टे धारकांना पाठीशी घालण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने महसुल प्रशासनाचा सावळा गोंधळ शुक्रवार दि.२७ जानेवारी २०२३ रोजी तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या दालनात दाद मागण्यासाठी प्रत्यक्ष पुराव्यासह हजर झालेला तालुक्यातील खडाळा येथील शेतकरी दामोदर सुदामराव हिंगे शेत सर्वे क्रमांक २४ हा महसुल प्रशासनातील भ्रष्ट कारभाराची अक्षरशः चिरफाड करून गेला.

पूर्णेच्या तहसीलदार पल्लवी टेमकर व महसूल प्रशासनाने सिल केलेल्या तालुक्यातील बेकायदेशीर चालणाऱ्या १४ खडीक्रेशर/ दगडखानपट्ट्यातील खडाळा येथील व्यंकटेश नंदकुमार वडगावकर हा खडीक्रशर दगडखानपट्टा धारक आपले सर्वे क्र.२४ मधील संबंधित खडीक्रशर/दगडखानपट्टा महसुल प्रशासनाने सिलनाट्य रंगवल्यानंतर देखील रात्रीच्या अंधारात स्फोटकांचा वापर करीत प्रचंड प्रमाणात उत्खननासह बेकायदेशीररित्या खडीक्रेशर



चालवून खडीनिर्मितीचा उद्योग सुरळीतपणे चालवत असल्याचे व त्यामुळे आपल्या शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याचा प्रत्यक्ष पुरावा अर्थात नोटकेम मधील फोटो व विडीओ तहसिलदार टेमकर व महसुल प्रशासनाचे नायब तहसिलदार नितेशकुमार बोलुलो यांच्या समोर पत्रकारांसमोर सादर केल्याने तहसिलदार टेमकर यांनी संबंधित खडीक्रशर चालक व्यंकटेश नंदकुमार वडगावकर व संबंधित क्षेत्राचे तलाठी यांना आज सोमवार दि.३० जानेवारी २०२३ रोजी तहसिल कार्यालयात हजर होण्याचे आदेश जरी दिले असले तरी प्रत्यक्षात मात्र कारवाई होईल की पुन्हा एकदा कारवाईनाट्य रंगवले जाईल ? या प्रश्नाचे उत्तर तर तहसिलदार टेमकर यांना जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनीच विचारावे.

# साहित्य कला मंचतर्फे कविसंमेलनाचे रविवारी आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**संगमनेर :** साहित्य कला मंच संगमनेर तर्फे रविवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२३ रोजी नवोदीत साहित्यकांसाठी कवीसंमेलन आयोजित केले आहे. हे संमेलन व्यापारी असोसिएशन हॉल, जोशी स्वीट होमजवळ, संगमनेर येथे दुपारी १-३० ते ६ या वेळेत भरणार आहे. या कार्यक्रमास सुप्रसिद्ध कवी, गीतकार बाबासाहेब सौदागर हे प्रमुख पाहुणे लाभले आहेत. यासाठी भाग घेणाऱ्यांस कवी कवियत्रींना प्रत्येकी शंभर रूपये शुल्क आकारण्यात येणार आहेत. त्यासाठी आगाऊ पेमेंट फोन पे / गुगल पे / अँमेझान पे / ने८३२९०६२४३३ अनिल चांडक (सचिव) किंवा ९७६३५३२७५२ संजय नवले (अध्यक्ष) किंवा सौ. सुनिता घुले (उपाध्यक्ष) ८९७५२३४१४२ (गुगल पे) या नावावर पाठवावे. प्रवेश संख्या वेळेअभावी मर्यादित असून अगोदर नोंदणी करणाऱ्या पहिल्या पन्नास कवींना भाग घेता येईल. भाग घेणाऱ्या कवी कवियत्रींना सहभाग प्रमाणपत्र व सन्मानचिन्हाने गौरविण्यात येईल. नोंदणीसाठी अनिल चांडक८३२९०६२४३२, संजय नवले९७६३५३२७५२, सौ. सुनिता घुले ८९७५२३४१४२,दर्शन जोशी ७९७२८४९४३५ ह्या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ताः खुलताबाद) येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन व बारावीतील विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचा कार्यक्रम मंगळवार (ता:३१) संपन्न झाला अध्यक्षस्थानी संस्थाप्रमुख विजय द्वार कुंडे हे होते प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव भाऊसाहेब काळे डॉक्टर विष्णु सुराशे डॉक्टर संजय गायकवाड रामदास गायकवाड रावसाहेब जाधव अशोक काळे पुंजाजी नलावडे माजी सभापती महेश उबाळे सीमाताई जाधव अर्चना वाघ प्राचार्य योगेश झिंजुर्के यांची उपस्थिती होती. प्रारंभी श्री छत्रपती शिवरायांचे पूजन व पुष्पहार अर्पणाने शुभारंभ झाला सर्व मान्यवरांचे स्वागत झाले. विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा यासह नृत्य व गीते सादर केली नाटकाचे प्रयोग सादर करण्यात आले. स्नेह व भावपूर्ण निरोपाचे प्रसंगी अनेकांनी भाषणातून या स्पर्धेच्या युगात बौद्धिक ज्ञान संपादन व प्रगतीकरणातून आपापली विदत्ता सिद्ध करता येते यशस्वीतेसाठी बुद्धिमत्ता श्रेष्ठ समजली जात असल्याने नियमित अभ्यासानेच चांगले यश संपादन करता येते त्यावरच विद्यार्थी वर्गाने भर द्यावा परीक्षाही कॉपीमुक्त असावी म्हणजेच खरी गुणवत्ता सिद्ध होऊन संस्था व गावाचा लौकिक वाढतो शिक्षणानेच जीवन यशस्वी जगणे सहज शक्य होते. विजय द्वार कुंडे यांनी समारोप करताना संस्थेने या परिसरात अध्यायावत सुविधायुक्त इमारत व ग्रामीण भागातून शिक्षणाला चालना घेण्यासाठी मुला-मुलींमध्ये अधिकाधिक सोयी सुविधा द्वारे नेहमीचा अभ्यास व्हावा यावर अधिक भर देण्यात आला आहे पालकांचा देखील चांगला सहभाग दिसून येत असल्याने शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या संस्थेत अधिक आहे त्याचे समाधान वाटते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक मनोज राणे योगिता पारनेरे नितीन पवार वृषाली कुलकर्णी राम राठोड भूषण जाधव सह शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# विनय कांचणेचे उत्कृष्ट नृत्य

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** शहरातील सुप्रसिद्ध असलेल्या हु.पानसरे शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात हु.पानसरे प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी मधील विद्यार्थी विनय कांचणे या सुनो गोरसे दुनिया वालो या गाण्यावर ग्रुप डान्समध्ये उत्कृष्ट नृत्य सादर केल्यामुळे उपस्थित प्रेक्षक, प्रमुख मान्यवर, शाळेतील शिक्षक, शिक्षिका व विधार्थी भारावून घेले आहेत. सदरील लावणीवर उत्कृष्ट नृत्य केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे.

हु.पानसरे शाळेत दर वर्षी प्रमाणे यंदाही प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवारी सायंकाळी शाळेत घेण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी काकाडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे. यावेळी पोलिस उपनिरीक्षक वाडेकर, माजी नगराध्यक्ष विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या मुली व मुलांनी सुरवातीला अनेक हिंदी गितावर उत्कृष्ट नृत्य सादर केल्यामुळे चिमुकल्या बालकलाकरांचे उपस्थित प्रेक्षकांनी कौतुक करीत होते. यावेळी पोलिस उपनिरीक्षक वाडेकर, माजी नगराध्यक्ष विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.



# इन्स्पायर पर्सनॅलिटी पुरस्काराचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईत कला संस्कृती फाउंडेशनतर्फे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. हॉटेल पेनिन्सुला येथे आयोजित सत्कार समारंभात डॉ. मुंबई हसलचे संपादक दिलशाद एस. खान, बेटी बचाओ बेटी पढाओ चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अजय एल. दुबे, धडक कामगार युनियनचे संस्थापक अभिजित राणे, आत्मनिर्भर भारतचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष रामकुमार पाल, सामाजिक कार्यकर्त्या मंजू लोढा, सामाजिक कार्यकर्ते अनिल मुरारका यांना इन्स्पायर पर्सनॅलिटी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी राजदूत राजा भाऊ सेठ, पंतप्रधान स्वावलंबी मोहिमेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष राजकुमार पाल, व्हॅक पीपल कौन्सिलचे संस्थापक डॉ.विजय डी बजाज, कवयित्री शिखा दीप्ती, त्रियोगी नारायण पांडे, मानद कुलगुरू सौहार्द शिरोमणी डॉ. सौरभ पं.स., प्रसिद्ध लेखिका डॉ. निक्की शर्मा, सय्यद सदन, मुदित आर्य यांचाही सन्मान करण्यात आला. कला संस्कृती फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा शीला शर्मा यांनी सांगितले की, कोविड काळात मानवतेच्या नात्याने आपली जबाबदारी पार पाडणाऱ्या आणि जबाबदारी पार पाडताना अपंगत्व आलेल्या अशा सेवानिवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांनी कला संस्कृती फाऊंडेशनसाठी एकप्रकारे आपली सेवा दिली आहे. आदरणीय माजी मंत्री हाजी अरफत शेख, शौर्य चक्र विजेते कारगिल योद्धा वीर दीप चंद गुप्ता, डॉ. विजय डी बजाज, हवालदार मंगेश सुर्वे, भारताचे शूर सैनिक कमांडो, मुंबईतील २६/११चे वीर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मंगेश नायक आणि कॅप्टन डॉ. प्रदीप पटनायक यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी फाऊंडेशनच्या अध्यक्षा शीला शर्मा यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांचेही समाजात महत्त्वाचे स्थान असल्याचे सांगितले. कारगिल योद्ध्यांचा तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याचा हा आनंददायी क्षण आहे. त्यांची समाजातील महत्त्वाची भूमिका नेहमीच राहिली आहे आणि राहील.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in